परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १२४ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ डिसेंबर २०२०

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

*प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना*
*माझा सस्नेह नमस्कार.*

दि. १४ मार्च २०२० पासून महाराष्ट्रात कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन सुरू झाले. विश्वव्यापी अशा या साथीने बाहेरच्या जगातील सर्व व्यवहारांना कुलुप लागलं आणि माणसं घरात बसली. सर्व व्यवहार ठप्प झाले. जमावबंदीचा आदेश आला.

पहिला लॉकडाऊन २४ मार्च ते १४ एप्रिल, नंतर दुसरा लॉकडाऊन १५ एप्रिल ते ३ मे, ४ मे ते १७ मे तिसरा लॉकडाऊन आणि १८ मे ते ३१ मे चौथा लॉकडाऊन सुरू झाला. दि. ३१ ऑगस्टला लॉकडाऊन शिथील झाले.

कोरोनाच्या ह्या दीर्घ काळाने आपल्याला बरेच काही बदलायला लावले. माणसाने आतापर्यंत सर्वच गोष्टींचा जो अतिरेक चालवला होता, त्याला परिस्थितीने, निसर्गाने दिलेली ही एक चपराक म्हणायला हवी. जीवनातल्या आवश्यक गोष्टी घरात राहून देखील करता येतात. उगाचच वणवण करण्याची गरज नाही. अनावश्यक गोष्टींना फाटा देणे आवश्यक आहे हे शिकवले. आत्मचिंतन व आत्मनिर्भर होण्याची आवश्यकता पटवून दिली. जीवनाची क्षणभंगुरता जाणवली. नात्यांचा खरा अर्थ समजला. सकारात्मक दृष्टिकोनाला झुकते माप दिले गेले. रामायण-महाभारताच्या काळात दूरदर्शनद्वारे फेरफटका मारला. अयोध्येच्या राममंदिराची पायाभरणी झाली.

प्रत्येक जण आरोग्याची काळजी घेऊ लागले. प्रतिकारशक्ती वाढविण्याचा प्रयत्न करू लागले.

अशा या काळात डिजिटल वर्ल्डमध्ये सर्वांनी शिरकाव केला. मराठे प्रतिष्ठाननेही जून आणि ऑगस्ट, सप्टेंबर, डिसेंबर अंक डिजिटल निघाले. ऑनलाईन वरदान ठरले आहे. यापुढेही ‘हितगुज’ ऑनलाईन निघणार आहे.

मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी दि. ३ जानेवारी २०२१ सकाळी ९ वा. स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मादाम कामा सभागृह, तळमजला, दादर शिवाजीपार्क येथे आयोजित केली आहे. जास्तीत जास्त कुलबांधवांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. २ डिसेंबर २०२०)
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२

**आपण सद्यस्थितीचा विचार करून ‘हितगुज’ जुन २०२०च्या अंकापासून आपला अंक ‘ई’ स्वरुपात प्रकाशित करत आहोत व आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देत आहोत. आपण आपल्या प्रतिक्रिया अवश्य द्याव्यात.**

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# दिवाळीचा फराळ!

• शेखर प्रभावळकर

**मि**ठाई उद्योगात चेंबूर मध्ये 'मराठी' झेंडा फडकवत ठेवणारे ''मराठे'' कुटुंबियांचे ''सरोज स्वीट्स'' गेल्या सत्तर ते ऐंशी वर्षांपासून, मुंबईत मिठाई व्यवसायात तसे महाराष्ट्रीयन पद्धतीची उपहार गृहे चालवण्यात अनेक महाराष्ट्रीयन व्यावसायिकांनी किंवा उद्योजकांनी स्वतःची अशी ओळख निर्माण केली. सत्तर वर्षांपूर्वी पासूनची अग्रगण्य नावे म्हणजे मुळ्ये, काणे, जोगळेकर, छत्रे, भागवत, तांबे, कुलकर्णी, पणशीकर, नाखरे आणि मराठे. वरील उद्योजगांपैकी भागवत, तांबे, कुलकर्णी हे काळाच्या ओघात वाहून गेले, पण अजूनही तग धरून राहिलेले व्यावसायिक म्हणजे पणशीकर, काणे जोगळेकर, छत्रे, नाखरे आणि मराठे. ह्यापैकी मराठे सोडल्यास सर्व व्यावसायिक मुख्यतः गिरगाव किंवा दादर येथील, पण, उपनगरात गेल्या ६५




वर्षांपासून कार्यरत असलेले एकमेव नाव म्हणजे मराठेंचे सरोज स्वीट्स! सरोज स्वीट्स प्रा. लि. हे चेंबूर मधले पहिले मिठाईगृह श्री. दामोदर कृष्णाजी मराठे यांनी सुरू केले. दामोदर पंत मूळचे धुळ्याचे, स्वतःचे नशीब आजमावण्यासाठी धुळ्याहून मुंबईला चेंबूर येथील टिळक नगर भागात आले आणि आयुष्यभर चेंबूर मध्ये नुसते स्थायिक झाले नाहीत तर सरोज स्वीट्सच्या रूपात गेल्या ६५ वर्षात, मिठाई जगतात स्वतःची अशी हटके ओळख निर्माण केली. अगदी दूधदुभत्या गाईच्या डेरी पासून ते मावा बनविण्यापर्यंत सारे काही त्यांनी स्वकष्टाने उभे केले. त्याचप्रमाणेच काळाची ओळख लक्षात घेऊन १९५५ मध्ये दामोदर पंतांनी रोवलेले हे रोपटे पुढे दामोदरपंतांच्या, चिरंजीवाने व सुनेने म्हणजेच श्री. शेषनाथ मराठे आणि सौ. मनीषा मराठे यांनी जोपासले आणि आणखी भरभराटीने नावारूपाला आणले. मनीषाताई वाणिज्य शाखेच्या पदवीधर लहानपणापासून आयपीएस होण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले, पण शेषनाथ रावांशी १९९३ साली लग्नगाठ बांधल्या नंतर आपले सर्व टॅलेंट त्यांनी कौटुंबिक उद्योगासाठी वापरण्याचा यथार्थ निर्णय मनीषा ताईंनी घेतला आणि आपल्या पतीला साथ दिली. शेषरावांनी ॲडमिनिस्ट्रेशन आणि प्रोडक्शनकडे लक्ष दिले, तर मनीषा ताईंच्या मनमिळाऊ स्वभावानुसार तसेच प्रचंड जनसंपर्क प्रस्थापित करण्याच्या कलेने त्यांनी सरोजचे मार्केटिंग स्वतःकडे घेऊन व्यवसाय वाढवण्याकडे लक्ष केंद्रित केले. मनीषाताईंनी लहानपणापासून त्यांना असलेल्या कलासक्त दृष्टिकोनाचा उपयोग करून सरोज मधल्या विविध गोष्टी नेटक्या तसेच आकर्षक करण्याकडे भर दिला. अगदी दुकानाच्या सजावटीपासून ते कर्मचाऱ्यांच्या गणवेशापर्यंत सारे काही मनीषाताई पाहू लागल्या. सरोज स्वीट्समध्ये पदार्थांची निर्मिती आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून केली जाते.

येणारा प्रत्येक ग्राहक नुसती मिठाई घेत नाही तर एक सुखद अनुभव सोबत घेत असतो तसेच मिठाई खाणाऱ्याला त्या मिठाई खाण्यामागची भावना असते - आनंद, उत्सव आणि आयुष्यातील सुखद क्षणांची गोड आठवण म्हणून मिठाई खालली जाते. इतकेच नव्हे तर कुठल्याही शुभकार्याचा श्रीगणेशा करायचा असेल तर देवापुढे नारळ आणि मिठाईच ठेवली जाते, ह्या सर्वांचे भान ठेवून सरोजमध्ये बनणाऱ्या प्रत्येक पदार्थाला शुद्धता आणि सात्त्विकतेची जोड देऊन श्री. व सौ. मराठेंनी आपल्या ग्राहकांची पसंती मिळविली.

जो आपल्याला भरभरून देतो त्याच्या पुढ्यात सुद्धा शुद्ध, सात्त्विक नैवेद्य आसावा ही प्रामाणिक भावना जपली. त्याचप्रमाणे आपल्या हिंदू धर्मामध्ये ग्राहक हा देव असतो. मग त्याला तरी कमी दर्जाचे पदार्थ वापरून बनवलेली मिठाई कशी द्यायची? हे तत्व मराठे कुटुंबीयांनी अगदी घट्ट उराशी बांधून सरोजचा हा सुमधुर झेंडा ऊंच आणि अबाधित ठेवला.

स्वच्छता आणि टापटिपी बद्दल बोलायचे झाल्यास मनीषाताई म्हणतात ''कुणी कधीही सरोजमध्ये यावे आणि

*(पान २६ वर...)*

# संवाद कुलबांधवांशी

•श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

नमस्कार कुलबांधव भगीनींनो,

लॉकडाऊनमुळे आपल्या सर्वांवर मार्च २०२० पासून आलेल्या विविध बंधनांमुळे आपण आपला 'हितगुज' जून २०२० पासून 'ई' स्वरुपात काढायचा जो निर्णय घेतला त्यानंतरचा हा तिसरा अंक. आपल्याप्रमाणे भावे यांचे द्वीमासिक आणी भिडे यांचे त्रैमासिक देखील 'ई' स्वरुपातच प्रकाशित झाले. या अंकाला कुलबांधवांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे व बरेच जणांनी असे सुचवले आहे की यापुढे देखील अशाच प्रकारे अंक प्रकाशित करावा. यामुळे आपण यापुढे 'हितगुज'सह आपल्याला पाठवण्यात येणारी विविध प्रसंगानुरूप पत्रे व वार्षिक अहवाल 'ई' स्वरुपातच पाठवायचे ठरवले आहे. यासाठी आपण दोन गोष्टी करायच्या आहेत पहिली म्हणजे आपला व आपल्या कुटुंबीयांचा ई-मेल आयडी तसेच मोबाईल नंबर आम्हाला पाठवला नसेल तर लगेच पाठवून द्यावा व दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या ओळखीच्या प्रत्येक कपीगोत्री मराठेंना याची माहिती देऊन त्यांना त्यांचा ई-मेल आयडी व मोबाईल नंबर पाठवण्यास सांगावे व पाठपुरावा करावा. थोडक्यात आपण प्रत्येक जण प्रतिष्ठानचा प्रतिनिधी आहे असं समजून ही गोष्ट करायची आहे व त्याचमुळे आपण प्रत्येकापर्यंत पोहोचू शकू.

या कोरोनाच्या काळामध्ये सर्व बंधने असतांनाही आपली प्रतिष्ठानची कामे शक्यतो वेळेवर करण्याचा प्रयत्न केला व यासाठी सर्वांनीच सहकार्य केले. या काळात संस्थेच्या विविध मुदतठेवींची मुदत दोन वेळा संपली, प्रवास करता येत नसुनही बँकांचे सहकार्य घेऊन वेळेवर नुतनीकरण करण्यात आले. तसेच मागील वर्षीच्या हिशोबाचे काम करून, ऑडिट करून अहवाल पोस्टाद्वारे सर्वांना पाठवण्यात आला. संकटे कितीही आली त्यावर मात करून पुढे जाणे, थांबणे नाही हेच खरे. म्हणून जर कोरोना तसेच त्यासारख्या इतर आजारांवर मात करायची असेल तर काम थांबवणे हा उपाय नसून सतर्क राहून, काळजी घेऊन तसेच एकमेकांशी सुरक्षित शारीरिक अंतर ठेवून रोजची कामे करत राहणे हाच उपाय आहे.

मंडळी आम्ही कार्यकारी मंडळाचे सभासद स्वत:चे उद्योग-नोकरी सांभाळून संस्थेचे काम करत असतो, आपले संस्थेचे कार्यालय नाही त्यामुळे कायमस्वरूपी कोणी कार्यरत नाही त्यामुळे आपल्या सभासदांनी पाठवलेल्या पत्रांना, ई-मेलला उत्तर देण्यासाठी विलंब होऊ शकतो. आपण सगळे समजून घेताच मात्र काही जण याला अपवाद आहेत. तरी कृपया या गोष्टी समजून घेऊन आम्हाला सहकार्य करावे. तसेच आपल्याकडे असलेल्या निधीच्या व्याजातून आपण वैद्यकीय व शैक्षणिक मदत देतो, तेव्हा जास्त मदत देणे शक्य होत नाही. तरीही शक्य तितक्या त्वरेने आम्ही गरजूंना आमच्या मर्यादा सांभाळून शक्य ती मदत करतोच.

यावर्षी नेहमीप्रमाणे घरगुती गणपती उत्सव सजावट स्पर्धा आयोजित केली होती, मात्र वारंवार आवाहन करूनही तीनच प्रवेशिका प्राप्त झाल्या. तरीही परीक्षकांकडून परीक्षण करून तीन क्रमांक काढण्यात आले व त्यांची बक्षिसाची रक्कम त्यांच्या खात्यात पाठवण्यात आली. पुढील वर्षी प्रतिसाद जास्त मिळणे अपेक्षित आहे अन्यथा स्पर्धेचा फेरविचार करावा लागेल.

यावर्षी कोरोनामुळे शाळा कॉलेज यांचा गोंधळ असल्याने परीक्षा वेळेत झाल्या नाहीत. झालेल्या परीक्षांचा दर्जाही विचार करण्यासारखाच आहे. त्यामुळे बक्षिसासाठी अर्ज आले नाहीत. बघू यापुढे कोणाचे येतात का. तोच प्रकार शैक्षणिक मदतीचा देखील आहे.

गेल्या काही अंकामधून आपण लेखनामध्ये वैविध्य आणायचा प्रयत्न करत आहोत व यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील कुलबांधव व भगिनींना संपर्क करून लिखाण पाठवण्यासाठी प्रोत्साहीत करत आहोत. या अंकामध्ये एक विशेष लेख छापला आहे, जो मला पुनच्छ या डिजिटल प्रकाशनाकडून मिळाला. आपल्या पहिल्या कुलवृत्तांताचे संपादक कै. कृष्णराव मराठे यांचे वरील एक लेख प्र.सि.कोल्हटकर यांनी वाङ्मयशोभा मधे सप्टेंबर १९६० लिहीला होता. सदर लेख पुनच्छ मधे छापायचा असल्याने त्यांच्या संपादक मंडळाकडून मराठे यांची माहिती व फोटो संबंधी विचारणा झाली. मी श्रीनिवास मराठे यांना संपर्क साधून आपल्या कुलवृत्तातून ती माहीती मिळवून त्यांना दिली. त्याचबरोबर मी तो लेख आपल्या 'हितगुज'मध्ये छापण्यासाठी परवानगी मिळवली. पुनच्छ हा श्री. किरण भिडे यांनी सुरू केलेला गेल्या १५० वर्षातील निवडक लेख लोकांपर्यंत पोहोचवण्याचा डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. जुने जुने लेख या

काळातही ताजेच वाटतात.

आणखीन एक सरोज स्वीटचे मराठे, यांचेवर लेख छापला आहे. हे मराठे आपले फक्त आडनाव बंधू आहेत, मात्र नवीन पिढीला उद्योग करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून सदर लेख छापला आहे. याचबरोबर आणखीही विविध विषयांवरील लिखाण छापले आहे, आपण याचा आनंद घेऊन प्रतिक्रिया अवश्य पाठवत रहा. आपल्या प्रतिक्रिया आपण ई-मेल अथवा मोबाईल द्वारे पाठवू शकता. सूचनांचे स्वागतच आहे.

आपल्या सर्वांनाच आवाहन करत आहोत की आप-आपल्या क्षेत्रातील अथवा आवडीच्या विषयावरील लिखाण आमचेकडे अवश्य पाठवत रहावे. शक्य होईल तसे ते लिखाण प्रसिद्ध केले जाईल.

आता या अंकापुरती आपली रजा घेतो. यानंतरची भेट मार्च २०२१ मधे. २०२१ या नवीन वर्षासाठी आपणा सर्वांना खूप खूप शुभेच्छा.

♦

---

**१) देव म्हणजे...**

देव म्हणजे देव म्हणजे देव असतो
माझा तुझा सर्वांचा सखा एकमेव असतो
भाजीच्या फोडणीत, लोणच्याच्या बरणीत तो
नारळाच्या चटणीत, वड्यांच्या तळणीत मला तो दिसतो.
आंब्याच्या कोयीत, दुधावरच्या सायीत
जिलबीच्या कढईत, थंड जलाच्या सुरईत मला तो दिसतो.
करताना हे पदार्थ मीअन्नपूर्णा अनुभवते,
वाढताना गौरी अनुभवते, शिकताना आईला अनुभवते
आणि प्राशन केल्यास मी पूर्णब्रम्ह अनुभवते.
असा हा माझा देव
चुलीच्या विस्तवात स्थिरावतो.
पौष्टिकतेच्या निकषांत खरा उतरतो.
प्रतिकारशक्तीचा द्योतक होतो.
आणि सरतेशेवटी कोरोनाचा विरोधक होतो.
तर या अन्नरूपी पूर्णब्रम्हाला कधी नासून देऊ नका
पुढ्यात वाढलेलं ताट कधी टाकून देऊ नका.
कित्येकांना शिळं अन्नही गिळावं लागत आहे
तर या अन्नरूपी देवाची चणचण भासू देऊ नका
गंमत बघा कशी आहे
हे अन्न पंचतत्वांनी बनले आहे
प्राशन करताना पाच बोटांनी खाल्ले आहे
पाचकरसात पंचामृत दडले आहे.
आणि शेवटी ते पंचमहाभुतांनाच जाणार आहे.
मातीतील अन्न मातीतच मिसळतं
कधी रक्त बनून ते नसानसांत सळसळतं
प्राणवायू बनून ते श्वासांत भिनतं
आणि जीवन बनून जिवंत ठेवतं.
तर अशा या देहरूपी देवाला
कोरोनाच्या विळख्यातून दूर ठेवण्यासाठी
अन्नरूपी ब्रह्मदेवाचे सादर सेवक व्हा.
आणि या विश्व संकटाला नष्ट करण्यासाठी
स्वच्छतेचे प्रसारक व्हा. नमोस्तुते

**२) मी थोडीफार जगलेली गीता**

मदत करताना दुसऱ्याला मी माझा नफा कधी बघत नाही,
मोबदल्यात काही मिळेल अशी आशा कधी धरत नाही.
खोटं कोणी वागत असेल तर ते मला चालत नाही
खरेपणाने न वागणाऱ्यांशी जास्त मी बोलत नाही.
शक्यतो मी नसते जास्त कोणाच्याही अध्यात मध्यात
पण कोणी अडसर बनून वाटेत अडवले तर त्यास मी सोडत नाही.
काही बाबतीत दुसऱ्याशी वागावे लागते जशास तसे,
रक्तपिपासू या जगात नाहीतर सगळेच भरतील आपलेच खिसे.
जे झालं, जे होतंय, आणि जे घडणार आहे भावी जगात,
चांगल्यासाठीच आहे आपल्या हा विश्र्वास बाळगते मनात.
काय करु काय नको हा प्रश्न पडतो जेव्हा,
सोडून द्यावे नियतीवर सारे हाती नसते काही तेव्हा.

**३) गुरु**

गुप्त कलागुणांना माझ्या जो रूप देतो तो माझा गुरु
जे कमी आहे माझ्यात त्यात खूप देतो तो माझा गुरु
चुकत असेल कुठे तर तिथल्या तिथे दावतो तो माझा गुरु
संकट माझे ताडून माझ्यासाठी धावतो तो माझा गुरु
मार्ग सापडत नाही तेव्हा माझ्यासोबत वाटसरू होतो
इच्छापूर्ती करण्याकरिता कल्पतरू होतो
देवरुपी कामधेनूचे वासरू होतो
आकांक्षांचे पंख पसरून पाखरु होतो
नवजात बालकाच्या घडण्यात माझा गुरु असतो. आदर्श पालकांच्या स्नेहात माझा गुरु असतो जीवाभावाच्या प्रत्येक नात्यात माझा गुरु असतो सरतेशेवटी बंद डोळ्यांनी जो आसमंत दिसतो त्या आसमंततातही माझा गुरु वसतो.

**लेखन : सौ.शिल्पा नंदकुमार गोखले**

*विश्वस्त श्री. सिताराम खांबेटे यांची कन्या*

# इच्छापत्र : अपरिहार्य पण दुर्लक्षित दस्तावेज

◆ श्रीनिवास मराठे (पृ.३९२), दादर, मुंबई भ्रमणध्वनी : ९८३३२१६४६८

**मृत्यू.....**

किंतीही टाळावा म्हटलं तरी न टाळता येण्यासारखी एक अनिष्ट घटना! त्यामुळेच की काय त्याच्याशी संबंधित असलेल्या 'इच्छापत्र' या एका अतिशय आवश्यक पण अप्रिय दस्तावेजा बद्दल बरीच अनास्था आहे. या कोविडच्या साथीच्या काळात अनेकांना बहुधा त्याचे महत्व पटले असेल. विशेषतः बदलती कुटुंबव्यवस्था, जलद गतीने सुधारत असलेली आर्थिक स्थिती आणि आपली उर्वरित सर्व संपत्ती आपल्या हयातीतच अपत्यांना देऊन टाकण्याची वृत्ती यामुळे आपल्या हयातीत 'आर्थिक विवंचना अथवा परावलंबित्व येऊ नये' या दृष्टीने इच्छापत्राचे महत्व अधोरेखित करण्याचा हा प्रयत्न आहे. विशेषतः या कोविडच्या काळात घरकाम करणाऱ्या नोकरवर्गाची उपयुक्तता आणि त्यांचे झालेले हाल आपण पाहिले आहेत. आपल्यासाठी काही स्वयंसेवी संस्थादेखील धावून आल्या असतील. यामुळे आपल्या इच्छापत्रात त्यांच्यासाठी तसेच स्वयंसेवी संस्थांसाठी काही तरतूद करणे हे देखील आपले कर्तव्य ठरते नाही कां?

त्याविषयीची माहिती मी या lockdownच्या पहिल्या महिनाभराच्या काळात संकलित केली होती. एका दमात सलग २५/३० पानं वाचण्यात बहुतेकांना रस नसतो आणि संयम देखील! पण विषयाचं गांभीर्य लक्षात घेता हे लेखन आवश्यक वाटलं म्हणुन हा प्रपंच! सुमारे ६ लेखांक २ परिशिष्टे आणि १ नमुना इच्छापत्र असे ९ लेखांक आहेत. दर अंकात एक लेखांक सादर करेन. ही लेखमाला आपल्याला उपयुक्त ठरावी असे वाटते. प्रचलित कायद्यातील बहुतेक तरतुदींचा अभ्यास करून हे लिखाण केले आहे. परंतु मी कायद्याचा जाणकार किंवा अभ्यासक नाही. एका ज्येष्ठ आणि जाणकार वकिलांकडून बहुतांश कायदेशीर भाग तपासून घेतला आहे. तरीही काही त्रुटी असल्यास आणि त्या आपल्याला आढळल्यास कृपया त्या निदर्शनास आणून दिल्यास मी अत्यंत ऋणी राहीन.

**इच्छापत्र : किती आवश्यक आणि का?**

कोविडनिर्मित भयगंडाच्या या काळात, आपल्या जीविताविषयीच शंका उत्पन्न होऊ लागली आहे. त्यामुळे इच्छापत्र लिहिणे या कामासाठी याहून अधिक योग्य व उपयुक्त मुहूर्त शोधून सापडणार नाही. कोणालाही भयभीत करण्याचा उद्देश अजिबात नाही; परंतु ही वेळ टळू न देता, आतातरी इतकी वर्षं 'नंतर बघू' असा मंत्र जपणाऱ्यांनी इच्छापत्र लिहायला घ्यावे असे प्रकर्षाने वाटल्याने हा प्रपंच.

आपल्यापैकी बहुतेक व्यक्ती (हल्ली यात स्त्रियादेखील अंतर्भूत) आयुष्यभर मरेस्तोवर काम करून धनसंपत्तीचा संचय करण्याच्या कामात गर्क असतात. मात्र, एक गोष्ट आपण विसरतो की, धनवृद्धीसाठी अधिक धनप्राप्तीइतकीच आवश्यक गोष्ट असते ती, कमावलेल्या धनाची योग्य गुंतवणूक आणि नियोजन. आपल्या हयातीत कुटुंबप्रमुख (किंवा त्याची/तिचा सहकारी) या नात्याने कुटुंबाप्रती अनेक उत्तरदायित्वे असतात, उदा. सर्वप्रथम निवारा, मग अपत्यांचे संगोपन, त्यांचे शिक्षण आणि नंतर त्यांच्या (विशेषतः कन्येच्या) विवाहापर्यंत त्यांची काळजी घेणं! या सर्वांसाठी आवश्यक अर्थार्जन करणारी व्यक्ती, केवळ तिच्या या जगात नसण्याने, कुटुंबाची किती अपरिमित हानी होऊ शकते याविषयी इतकी अनभिज्ञ आणि पराकोटीची उदासीन का असते?... हे एक कोडंच आहे.

याच कारणाने मालमत्तेचं संगोपन व व्यवस्थापन आपल्या हयातीतच नव्हे तर हयातीनंतर देखील करणे अगत्याचे आहे याची जाणीव असणे अत्यंत आवश्यक आहे. तरीही 'जिंदगीके साथ भी, जिंदगीके बाद भी' या घोषवाक्यामधला जिंदगीके बाद विशेष साथ देणारा जीवनविमा ही चीज अनेकांना उगाचच अनावश्यक वाटते. विम्याची गरज ही स्वतःसाठी नसून आपल्या प्रियजनांसाठी आहे ह्याची जाणीव होणं आत्यंतिक जरुरीचं आहे असं मला वाटतं. आपापल्या नोकरीधंद्यानुसार ही गरज काहींना अति तरुण वयात तर काहींना निवृत्तीच्या आसपास भासू शकते. पण अर्थार्जन चालू असताना विमा घेणे प्रामुख्याने (वार्षिक उत्पन्नाच्या किमान १५ पट Term Insurance) हे कधीही फायदेशीर! कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या अकाली मृत्युनंतर इतरेजनांना विम्याचं महत्त्व नक्कीच जाणवतं. जीवनविमा हेच तर आहे मृत्युनंतरचे आपत्ती आणि संपत्ती व्यवस्थापन.

'इच्छापत्र' लिहिणं म्हणजे काही आपल्या 'Death Warrant' वर सही करणं नव्हे. आयुष्यभर ज्यांच्यासाठी खस्ता काढल्या त्यांच्यासाठी आपल्या मृत्युनंतर आपल्या मिळकतीचा विनियोग सुयोग्य रीत्या होण्यासाठी केलेली ती

एक व्यवस्था असते. आपल्या मिळकतीचे समान (Equal) भाग करून आपल्या वारसांना देणे यापेक्षा मिळकतीचे न्याय्य (Equitable) विभाजन हे अधिक योग्य असलं तरी इच्छापत्रात सर्वोच्च प्राधान्य असतं ते, इच्छापत्र लिहिणाऱ्याच्या इच्छेला! त्यांत आपल्या वारसांना अगदी फुटकी कवडी देखील न देता धर्मादाय संस्थांना/अनाथालयांना सर्व संपत्ती किंवा तिचा काही हिस्सा दान म्हणून देणं हा एक टोकाचा पर्याय देखील असू शकतो. अर्थात आपल्या मालमत्तेची विभागणी आपल्या आवडत्या (आणि नावडत्या देखील) व्यक्तींमध्ये न्याय्य रीतीने करणे हे केव्हाही सामंजस्याचे! संपत्ती बरीच असेल तर त्याच्या नियोजनासाठी खासगी न्यास (Private Trust) स्थापण्याचा पर्यायदेखील आजमावायला हरकत नाही. मात्र इच्छापत्र केलेच तर किंवा जेव्हा केव्हा ते केले जाईल तेव्हा अशा न्यासाचा उल्लेख त्यात असणे आवश्यक असते. शिवाय अशा न्यासावर विश्वस्त म्हणून कार्य करण्यासाठी अत्यंत विश्वासू अशा व्यक्ती/व्यक्तींची आवश्यकता असतेच!

नामनिर्देशन (Nomination) विषयी Banking Regulation Act 1949 मध्ये नियम अस्तित्वात होते, तरी ते केवळ बँकांतील ठेवी, लॉकर्स आणि सुरक्षित ठेवण्यासाठी ग्राहकांकडून घेतलेली कागदपत्रे या संदर्भात लागू होते. या संदर्भात विस्तृत नियमावली १९८५ पासून अस्तित्वात आली, ज्याद्वारे ही सुविधा बँकांतील सर्व व्यवहारांसाठी लागू झाली. नंतर क्रमाक्रमाने अल्पबचत योजनांतील गुंतवणूक, कंपन्यांतील ठेवी, स्थावर मालमत्ता या वा अशा इतर अनेक आर्थिक साधनांच्या बाबतीतदेखील अशी नियमावली अस्तित्वात आली. यामुळे आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्थांवरील (विशेषतः बँकांवरील) अनावश्यक कायदेशीर जबाबदारी कमी झाली. शिवाय या प्रक्रियेत होणारा विलंब बऱ्याच प्रमाणात कमी झाला. मात्र बदलत्या कुटुंब रचनेमुळे, याची परिणीती वारसांतील वाद वाढण्यात झाली आणि आपला वारसाहक्क सिद्ध करण्याची जबाबदारी वारसांवर आली. मात्र नामनिर्देशित व्यक्ती, अशा रीतीने प्राप्त संपत्तीची, केवळ विश्वस्त असते... मालक नव्हे! परंतु या तरतुदीची कल्पना अनेकांना नसते किंबहुना नाही. त्यामुळे आधीच्या पिढीतील बहुसंख्य व्यक्ती आपल्या संपत्तीच्या इच्छित वारसाला नामांकन देत. तसे केल्यानंतर आपल्याला इच्छापत्र करण्याची गरज नाही असा समज पूर्वी होता. आणि बऱ्याच प्रमाणात तो अजूनही कायम असला तरी चुकीचा आहे.

या एका कारणाने आर्थिक संस्था, (सरकारी, निमसरकारी किंवा खासगी), संभाव्य कज्जे टाळण्याच्या उद्देशाने इच्छापत्र असल्यास प्रोबेट, इच्छापत्रात व्यवस्थापकाचा उल्लेख नसल्यास Letter of Administration आणि इच्छापत्राअभावी वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession) या कागदपत्राशिवाय हक्क हस्तांतरित करीत नाहीत. त्यामुळे, नामांकन सुविधेचा वापर करण्याऐवजी, आपल्या मृत्युनंतर आपल्या इच्छित वारसांविषयी इतर वारसांत कटुता व कलह होऊ नये, या दृष्टीने इच्छापत्र करणे अत्यावश्यक ठरते. पहा https://www/rbi.org.in/scripts/NotificationUser.aspx?ID=1804&Mode=0

**इच्छापत्र म्हणजे काय?**

१. इच्छापत्राचा कर्ता/कर्ती (Testator/Testatrix): म्हणजे इच्छापत्र लिहिणारा

२. व्यवस्थापक/निष्पादक (Executor/Executrix): याची नेमणूक सर्वस्वी कर्त्याच्या मर्जीवर असते. इच्छापत्रातील तरतुदींना प्रत्यक्षात आणण्याचं काम हो करतो. कर्त्याच्या मृत्युनंतर त्याच्या मालमत्तेचा मालक त्याच्या इच्छापत्राचा व्यवस्थापक असतो. या कारणाने कर्त्याच्या मालमत्ता (Assets)/देणी (Liabities) यांचे त्याच्या इच्छेनुसार वाटप/वसुली/परतफेड ही कार्य पार पाडण्याची जबाबदारी याची असते. पर्यायी व्यवस्था म्हणून, कर्ता एकापेक्षा अधिक व्यक्ती व्यवस्थापक म्हणून नेमू शकतो. अर्थात या कामांसाठी त्यांची पूर्वपरवानगी घेणे श्रेयस्कर!

३. इच्छापत्राचा लाभार्थी (Legatee) : इच्छापत्राद्वारे होणारा/रे मालमत्तेचा/चे लाभार्थी.

इच्छापत्र म्हणजे कर्त्याच्या मृत्यूपश्चात त्याच्या मालमत्तेच्या विभाजनाविषयी त्याच्या स्वतःच्या इच्छेचे, त्याने स्वतः केलेले सनदशीर घोषणापत्र. इच्छापत्र या संज्ञेत पुरवणी इच्छापत्र (Codicil)चा तसेच मृत्युपश्चात मालमत्ता नियोजनासाठी केलेल्या, इच्छापत्रसदृश इतर कागदपत्रांचा देखील अंतर्भाव होतो. इच्छापत्र कर्ता आपल्या हयातीत कितीही वेळा इच्छापत्रात बदल, पुरवणी इच्छापत्र किंवा सर्वस्वी नवीन इच्छापत्र करू शकतो. अर्थातच इच्छापत्र प्रवाही (ambulatory) आहे.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, 'इच्छापत्र हे त्याच्या कर्त्याच्या मृत्युपश्चातच अंमलात येईल' असा स्पष्ट उल्लेख त्यांत असावा. तसेच कोणतेही कागदपत्र 'हे इच्छापत्र आहे' असा स्पष्ट उल्लेख असल्याशिवाय इच्छापत्र म्हणून गणले जाणार नाही. 'कर्ता आपले इच्छापत्र हयातीत कितीही वेळा बदलू शकतो' असाही महत्त्वाचा निर्णय आहे. पुढील लिंक परिच्छेद २८ पहा : htpps://www.casemine.com/judgement/in/5608f85be4bo14971114225d

*क्रमशः*

# गुपित

• राधा मराठे (पृ. ३७८)

संध्याकाळी काय करावं या विचारात मोहिनी टीव्हीच्या रीमोटशी खेळत होती तर फोन वाजला. लँडलाईनवर कोण .... असा विचार करत तिने फोन घेतला.

''अगं, मोहिनी, मी नंदू.''

''काय गं, आज एकदम लँडलाईन?''

''अगं ... ते मरू दे. मी काय सांगते ते ऐक आधी.''

मग नंदू-नंदिनीने जे काही सांगितलं त्याने मोहिनीची सुस्ती पार पळाली. प्राण कानात आणून ती नंदूचं बोलणं ऐकायला लागली. तिचा लेक नीलेश आणि नंदूची मुलगी प्रियाचं 'अफेअर' आहे याचा नंदूला संशय येत होता आणि त्याचा सज्जड पुरावा आत्ताच तिच्या हाती लागला होता. मोहिनी फेसबुकवर नव्हतीच. नंदिनीला तिच्या स्वत:च्या लेकीने ब्लॉक केली होती. आपलं प्रोफाईल, तिथले फोटो आईला दिसू नयेत म्हणूनच बहुतेक. पण आज नंदिनीच्या सोसायटीतल्या एकीने नव्याने फेसबुक जॉईन केलं आणि सोसायटीतल्या पोरा-पोरींची प्रोफाईल्स बघत होती, तर कार्टीच्या (हा नंदिनीचाच शब्द – मोहिनीला पियू आवडायची फार) प्रोफाईलवर तिचे आणि नीलेशचे एकत्र फोटो आणि 'happily together' अशी कॅप्शन. हे फोटो तत्परतेने नंदिनीला दाखवण्याचं सत्कर्म तिने आत्ताच पार पाडलं होतं. तिला कशीबशी वाटेला लावून तातडीने तिने मोहिनीला फोन लावला होता. मोहिनी हे सगळं ऐकून चक्रावली.

''खरंच असं काही असेल का गं नंदू?''

''असलं तर बरंच की गं. मी सुटले....'' (अशी वाक्यं मनात बोलायची असतात हे नंदिनीला चांगलं माहीत होतं. पण उघड ती इतकंच म्हणाली....)

''बघ ना गं या मुलांचे उद्योग. आपल्याला सांगायचं नाही का?''

''ए बावळट, आमचं अफेअर आहे असं सांगणार का? अफेअर चोरूनच करतात.''

''तू सांग आता मला. तुमच्या चिठ्ठ्या-चपाट्या पोचवून तेवढी हुशार झाले बरं मी. ते मरो गं बाई, आधी या मुलांचं काय करायचं ते सांग.''

मग दोघींनी फार खोल, गहन विचार करून एक प्लॅन ठरवला. आपल्याला कळलंय असं मुलांना मुळ्ळीच कळू द्यायचं नाही. बारीक नजर ठेवायची, एकदा रंगे हाथ पकडायचं. मग बघू पुढे काय ते.

फोन ठेवून दोघी आपापल्या स्वयंपाकघराकडे वळल्या. एका सोसायटीत राहणाऱ्या, एका वर्गात शिकणाऱ्या घट्ट मैत्रिणी होत्या दोघी. अगदी केजी ते बीए. लग्नं झाली तेव्हा आपापल्या नवऱ्याकडून पुन्हा पुन्हा वचन घेतलं की मैत्री तुटेल असं काही वागणार नाही. भले होते दोघे बिचारे. सांभाळली बायकोची मैत्री. मोहिनीचा नवरा तर आधीपासून ओळखत होता नंदिनीला. त्यांच्या भेटी, चिठ्ठ्या याला नंदूचाच आधार होता. मोहिनीच्या घरी कळलं तेव्हा पण नंदूनेच त्याच्या सभ्यपणाची ग्वाही दिली होती. मगच मोहिनीचे आईबाबा तिच्या सासू-सासऱ्यांकडे रीतसर सांगून गेले. मोहिनीचं प्लॅनिंग फसलं आणि पुढच्याच वर्षी नीलेश आला. नंदिनीचं लग्न थोडं नंतर झालं, आणि नंतर प्लॅनिंगप्रमाणे पियू झाली. एकत्र फिरणं, भेटणं सुरळीत सुरू होतं आणि मध्येच हा घोळ घातलाय मुलांनी. नीलेश जावई व्हावा अशी स्वप्नं नंदिनी बघत होती, पण त्यासाठी मैत्रीत बाधा यायला नको होती तिला. म्हणून ती गप्प होती. आज ती खूषच होती. मोहिनी मात्र विचारात पडली होती. म्हणजे पियू आवडत होती तिला, पण सून म्हणून तिच्याकडे पाहिलंच नव्हतं कधी.

रात्री नवऱ्याने विचारलंच, ''काय, आज मूड वेगळा दिसतोय?'' तिने सगळं सांगितलं आणि म्हणाली, ''पियूचा सून म्हणून चेहरा येईनाच डोळ्यासमोर. चांगली मुलगी आहे, मला आवडते. पण नीलेश इतका मोठा झाला आपले निर्णय आपण परस्पर करण्याइतका?''

नवरा हसला. ''आपण काय वेगळे वागलो होतो का? आठव की ते दिवस. आपलं काय वाईट झालं का, मग त्यांचं का होईल? शांत रहा, जे व्हायचं ते टळणार नाही. आम्ही आहोत इतका दिलासा असू दे मुलांना.'' त्याला सध्या गप्प राहण्याच्या प्लॅनविषयी सांगून म्हणाली, ''बघू या, आपल्याला कधी सांगतोय ते.'' त्याने मान डोलावली.

आता दोन्ही बाजुने हेर खातं जोरात कामाला लागलं. रोजचे मूड, उशीर, खरेदी, सिनेमे सगळ्याची चर्चा रंगायची जोरदार. काहीतरी कमेंट करून हसायच्या कधीतरी. एकंदरीत दोघी

आता या हेरगिरीत पुरत्या रमल्या होत्या. आणि अचानक...

सोसायटीमधली ती 'भवानी' एक दिवस प्रियाजवळ बडबडलीच. कसं फेसबुक सुरू केलं, तिचं प्रोफाईल पाहिलं, फोटो तिच्या आईला दाखवले... तिचं चालू होतं चऱ्हाट आणि प्रियाचे प्राण कंठाशी आले. काहीतरी कारण सांगून ती सटकली. पण नीलेश दिवसभर बिझी होता. फोन करू नको असं कालच सांगितलं होतं त्याने. आता? पण आईने काहीच कसं विचारलं नाही. तिला काही संशय नाही आला. शी:, कुठून बुद्धी झाली त्या भवानीला.... खरं म्हणजे मलाच. कशाला टाकायचे वॉलवर. प्रियाची दिवसभर नुसती तडफड. नाईलाजाने संध्याकाळी घरी आली तोंड पाडून. नंदिनीने विचारलंच, ''का गं तोंड उतरलंय. काही होतंय का? नीलेश भेटला नाही का आज?''

उडली प्रिया. म्हणजे ती टवळी आजचा वृत्तांत पण घरी सांगून गेली वाटतं. प्रिया एकदम गळ्यात पडून मुसमुसायला लागली. नंदिनीने तिला जवळ घेतलं. गोड बोलून सगळं काढून घेतलं. ती लास्ट ईयरला असतांना एकदा सिनेमाला गेली होती, तर मैत्रिणींशी चुकामूक झाली. गर्दीत एकजण अगदी जवळ येत होता. आता अंगाला हात लावणार इतक्यात नीलेश एकदम आला आणि त्याला ढकलून एकदम तिच्याभोवती हात टाकला आणि काही झालंच नाही असं दाखवत तिला बाहेर काढलं. मग मैत्रिणी येईपर्यंत जाम झापली एकटी गर्दीत शिरल्याबद्दल. तिला त्याच्या खांद्यावरच्या हाताने कसंतरीच झालं होतं, पण तो तसाच राहावा असं वाटत राहिलं. मैत्रिणींनी लांबून पाहिलं आणि मुद्दाम जरा वेळाने आल्या. त्या आल्यावर तो गेला. मैत्रिणींनी चिडवून हैराण केलं. तेही आवडलं. तो आधीच्या शोला आला होता. म्हणून बाहेर पडणाऱ्या गर्दीत होता. मग मोबाईलवर फोन, मेसेजेस, रात्री उशीरापर्यंत गप्पा. परीक्षा झाल्यावर संध्याकाळी बाहेर पडायला कारणं शोधणं. नंदिनीला आठवत होते एकेक प्रसंग. चकित होत होती. 'फारच चंट निघाली कार्टी!'

तीन वर्षं चालू आहे हे सगळं. तो प्रमोशनसाठी थांबलाय. प्रमोशन मिळालं की घरी सांगायचं म्हणाला. पण त्या भवानीने...

''हां, काय म्हणालीस?''

''पण आई, तू आता मावशीला सांगशील?''

हसू लपवत नंदिनी म्हणाली, नको सांगू? माझी बालमैत्रीण आहे. तिच्याशी कशी खोटं बोलू?

''पण आई...''

तिला थोपटत नंदिनी म्हणाली, ''शांत रहा. मी बघते.''

रात्री चौघांची गुप्त व्हीडीओ मिटींग झाली. आणि खूप चर्चेनंतर येत्या रविवारी घोषणा करून टाकायची असा ठराव पास झाला.

दरम्यान इकडे त्या दोघांची पण सिक्रेट मिटींग झाली. तो वैतागला. चिडला. बडबडला. त्याच्या एकेक शब्दासरशी तिचं अवसान गळत होतं. शेवटी ती रडायला लागली. आता फोनमधून कशी समजावणार. कशीबशी शांत केली. ''तू गप्प बस आता, मी करतो हँडल.''

रविवारी सकाळी मोहिनी टेबलाशी कोथिंबीर निवडत होती. नीलेश उठून आला.

''आई...''

''हं''

''मी काय म्हणतो...''

''म्हण''

''इतकी कोथिंबीर कशाला?'' (आँ? ट्रॅक चेंज?)

''दुपारी नंदूमावशीकडे जायचंय, ती वड्या करणार आहे. निवडून आण म्हणाली.'' (मी आणते ना तुला बरोब्बर ट्रॅकवर.)

''क् कशाला... नंदूमावशीकडे...?''

''तुला नसलं यायचं तर नको येऊ. ती देईल डब्यात घालून.''

''नाही... मी येईन ना. म्हणजे... तसं आज काही ठरलेलं नाहीये दुसरं काही. तर... जाऊ आपण.''

''बरं.'' तिचा संभाषणाला पूर्णविराम.

दुपारी नंदिनीकडे सगळी जमली. त्याचा अस्वस्थपणा बघून न बघितल्यासारखा होत होता. पियू उगाच आतबाहेर करत होती. निळ्या ड्रेसमध्ये नुसती 'परी' दिसत होती. पण सांगणार कसं... च्... सगळे होते ना समोर. एकदा काहीतरी कारण काढून तो तिच्यापाठून आत निघाला तर त्याच्या आईनेच काहीतरी काम सांगून हाक मारली. वड्या गार करत ठेवल्या आणि नंदिनी बाहेर आली. तसा तिचा नवरा थेट नीलेशला म्हणाला, ''काय मग जावईबापू, कधी करायचा साखरपुडा? आणि भरपूर हिंडून झालेलं आहे, आता लगेच मुहूर्त धरायचा बरं. फार लाड नाही चालणार आता.''

त्याचं दचकणं, सगळ्यांचं हसणं, पियुचं लाजणं आणि मोहिनीने तिला जवळ घेणं हे सगळं तर क्रमाने होणारच. त्यात लिहायचं काय वेगळं. डोळे मिटा, आपसूक दिसेल हे सगळं घडतांना.

दिसलं ना?

radhamarathe77@gmail.com

♦

# लक्ष्यावर लक्ष!

• डॉ. गिरीश जाखोटिया    भ्रमणध्वनी : ९८२००६२६१६

*(तुम्हाला सामान्यांसाठी असामान्य व्हायची इच्छा आहे?)*

नमस्कार मित्रांनो! दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा. माझ्या लहानपणी आईने मला एक कानमंत्र दिला होता – लक्ष्यावर लक्ष! म्हणजे तसूभरही लक्ष्यावरचं लक्ष ढळता कामा नये. अडचणी, अन्य आकर्षणे आणि लक्षाला बऱ्याचदा सहाय्यभूत नसणारी परिस्थिति, इत्यादी गोष्टी आयुष्यात येतच रहातात. आपण लक्ष बदलायचं नाही. हां, लक्ष्य हे चुकीचं किंवा अगदीच असाध्य ठरू नये म्हणून ते ठरवताना भरपूर विचार व विश्लेषण करायचं, लोकांची मते घ्यायची, स्वतःशीच संभाषण साधत त्याची यथार्थता तपासायची नि मग ते पक्कं करायचं. आजूबाजूचे नातेवाईक, मित्र, सहकारी व अन्य लोकांना तुमचं लक्ष्य पुस्तकी किंवा खूपच आदर्शवादी अथवा अगदीच अवाढव्य वाटू शकतं. परंतु हीच तर खरी गंमत असते! 'साधारण' लक्ष्यावर काम करणारे व दुनियादारी निभावणारे १३५ कोटी लोक देशात आहेतच की! यांच्या जगण्याला आधार किंवा अर्थ देणारं काम न करता आपण अंतर्धान पावायचं नाही. जवळचे लोक, मेडिया, सरकार किंवा प्रस्थापित पंडित आपल्या लक्ष्याची दखल घेत नाहीत म्हणून नाराज वा निराश नाही व्हायचं. हेतूपुरस्सर एक विशेष भावना मेंदूत व मनात जोपासायची – ''मला समुद्रातला एक थेंब बनून मरायचं नाहीये. मलाच समुद्र व्हायचंय!'' अर्थात यासाठी अहंमन्य किंवा तुच्छतावादी होण्याची गरज नसते. किंबहुना आपण जितके नम्र व साधे असू, तितक्या अडचणी आणि विरोध कमी! अहंकारी होण्याने आपण बेसावध होतो, थोड्या यशाने व कौतुकाने हुरळून जातो नि मग मोठे लक्ष्य बाजूला राहते.

''अमूल'' नावाचा मोठा उद्योग व ब्रँड निरागस शेतकऱ्यांच्या व गोपालकांच्या मदतीने उभा करताना डॉ. कुरियननी असंच मोठं लक्ष्य ठेवलं असणार. ''मिल्कमन ऑफ इंडिया'' आणि ''फादर ऑफ दी व्हाईट रिवोल्यूशन'' अशी प्रचंड आदराची बिरूदावली मिळवणारा हा गरीब शेतकऱ्यांचा 'महानायक' नंतर जगभर नावाजला गेला. पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, मॅगसेसे, कृषिरत्न असे अनेकोनेक पुरस्कार त्यांना मिळत गेले. सुरुवातीला त्यांनाही सरकारी बाबू, धनिक मोठे शेतकरी आणि पुढाऱ्यांचा त्रास सहन करावा लागला होता. कर्मवीर भाऊराव पाटील स्वतः खूप शिकलेले नव्हते परंतु ''रयत'' नावाचं अजस्र शैक्षणिक संकुल ते उभं करु शकले.

आपल्या लक्ष्यावर एकाग्रतेने व निराश न होता काम करण्याची दुर्दम्य इच्छा मुळात आपल्या अंतर्मनात ठाण मांडून बसलेली पाहिजे. रोज भेटणाऱ्या व पहाणाऱ्या लोकांना आपलं फारसं कौतुक नसतं. ''घरकी मुर्गी दाल बराबर'' ही म्हण प्रत्येकाला लागू होते. परंतु मुळात आपण फक्त या जवळच्या लोकांपुरतं छोटं लक्ष्य बाळगता कामा नये. सारी सामाजिक व आर्थिक परिस्थिती बिकट असताना डॉ. आंबेडकर हे स्वतःच्या लक्ष्यासाठी विलायतेस जातात नि नंतर एक जगतविख्यात घटनाकार बनतात. हे किती विलक्षण आहे! अगदीच तरुण वयात समाजाने वाळीत टाकलेले असताना ज्ञानेश्वर महाराज गीतेवर प्राकृत भाषेत 'ज्ञानेश्वरी' लिहितात, हे किती अतुलनीय कार्य होतं! कंत्राटदार व फुलांचे व्यापारी असणारे जोतिबा हे अन्य महिलांसोबत ब्राह्मण महिलांना सुद्धा शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतात नि नंतर ''गुलामगिरी'' नावाचा क्रांतिकारी ग्रंथ लिहितात. हे वैश्विक लक्ष्याचं परिमाण आहे. रा.धो. कर्वे कुटुंबनियोजनाबाबतीतलं अजोड व अविश्वसनीय काम जेव्हा करतात तेव्हा वाटतं यांना ही ऊर्मी कुठून आली असेल?

अगम्य, अमूर्त नि अचाट लक्ष्य बाळगणारी ही अफाट माणसं जेव्हा मी स्मरतो तेव्हा अक्षरशः एका अशाच अजोड जाणिवेने मी उल्हसित होतो. वाटतं हाती अर्जुनाचा गांडीव आलाय किंवा आईनस्टाईनचा शोधक विचार मेंदूत घुसलाय अथवा सम्राट अशोकाचा तो शांतीचा विराट ''बौद्ध'' विचार मनाला व्यापून राहिलाय. म्हणजे बघा, मोठ्या लक्ष्याचा विचार येण्यासाठी मुळात मी 'अस्वस्थ' व्हायला हवं. सारी गात्र त्या अफाट इच्छाशक्तीने प्रभावी व्हायला हवीत. मी माझ्यातल्या त्या ''असाधारण मी'' ला शोधायला हवं. माझ्या सांस्कृतिक, सामाजिक व बौद्धिक जाणिवांना मी कुंपण घालता कामा नये. आजूबाजूला 'फालतू' किंवा 'कूपमंडुक' विचार – आचार करणारे खूप असतात, त्यांच्या वैचारिक सावलीने माझ्या मनातील सूर्याला झाकोळता कामा नये. त्यांना न दुखावता मी माझ्या लक्ष्यावर अविरतपणे काम करायला हवं.

'लक्ष्य' असाधारण असण्यासाठी प्रथमतः एक गुळगुळीत

झालेलं विधान आपण बाजूला ठेवायला हवं, जसे की ''आमच्याकडे हे असंच होतं, असंच होत रहाणार!'' या विधानात 'शरणागतवृत्ती' आहे. किंवा बदल करण्याची इच्छा नसल्याने अथवा धमक नसल्याने आपणच एक पळवाट शोधून ठेवलेली असते. शंतनूराव किर्लोस्कर, आबासाहेब गरवारे, जमशेटजी टाटा इत्यादी मंडळींनी शून्यातून आपले औद्योगिक विश्व उभे केले. नियती, नशीब, समाज इ. गोष्टींना नावे ठेवत नकारात्मक जगणं कुणीही जगू शकतं. स्थानिक पुढाऱ्यांशिवाय आणि जातीच्या पाठिंब्याशिवाय आमची शेती सुधारणार नाही, असं गोलमटोल कारण देत दारिद्र्यात जगण्याची सवय लाखो शेतकरी सोडत नाहीत. ''आपण बदल घडवू शकतो'' या शक्यतेवरच यांचा विश्वास नसतो. इंग्रजांनी भारतीय स्वातंत्र्यसैनिकांना गंभीरपणे घेणं चालू केलं जेव्हा गांधीजींनी सामान्य जनतेला स्वातंत्र्यसंग्रामात सामील केलं. कोणत्याही नव्या कल्पनेवर काम करणारे हे ''पहिलटकर''च असतात. पहिला असणं हेच त्यांच वैशिष्ट्य असतं. एखादा यशस्वी झाला की त्याची कॉपी करणं हे बहुतेक भारतीयांच्या जनुकांमध्ये खोलवर रुतलेलं आहे. आम्हाला कोणताही धोका नको असतो, अपयशाची लाज वाटते, पुन्हा उभं रहाण्याचा आत्मविश्वास नसतो आणि कॉपी करणं तर खूप सोपं असतं.

तुमचं मत, तुमची धारणा, तुमचे निष्कर्ष आणि तुमची तत्त्वे ही आजूबाजूच्या हजारो लोकांना पटत नाहीत कारण ती तुमच्या लक्ष्याबद्दल व तपश्चर्येबद्दल अनभिज्ञ असतात आणि साधनेने वाढलेल्या तुमच्या कुवतीची ते बरोबरी करू शकत नाहीत. त्यांना आहे त्या व्यवस्थेत आराम हवा असतो. अशा मंडळींशी रोजचे संबंध सांभाळताना आपण त्यांच्याच समकक्ष येत वागलेलं बरं असतं. लक्षात ठेवा, तुमच्या मोठ्या लक्ष्यासाठी तुम्हीच स्वतःला जबाबदार असता. इतरांच्या शेलक्या मुल्यांकनाची फिकीर करू नका. तुमच्या क्षेत्रातील दिग्गजांचा आदर जरूर करा, त्यांना भिऊ नका. त्यांची मते खोडताना तुमचा गृहपाठ उत्तम झाला असेल तर डोळ्यात डोळे भिडवून सत्यकथन करा. बऱ्याचदा आपलं लक्ष्य मोठं करताना आपल्या वाटेवरुन पुढे गेलेल्यांच्या लक्ष्याशी आपण अनावश्यक व अतिरेकी तुलना करतो. उदाहरणार्थ, ऐतिहासिक किंवा पौराणिक काळातील एखाद्या अतिपुज्यनीय गुरुचं मत खोडण्याइतपत आपला अभ्यास झालेला असतो, आपण आपल्या लक्ष्याच्या अगदीच समीप आलेलो असतो परंतु त्या पुज्यनीय गुरूच्या संभाव्य कोपाची आपणांस भिती वाटते. संकोच, भिती आणि बेसावधपणा अंगी असल्यास ९९% लक्ष्य पुरे होऊनही आपण राहिलेल्या १% मध्ये अडकून बसतो. आपली आपल्या उद्देशावर पूर्ण निष्ठा असेल तर कोणत्याही दिग्गजाला घाबरण्याचं काहीच कारण नाही. लक्ष्यावर लक्ष ठेवूनच तो दिग्गज हा ''दिग्गज'' झालेला असतो. तेव्हा आपण ''लंबी रेसका घोडा'' आहोत हे लक्षात ठेवून नि स्वतःला कमी लेखणं बंद करुन या दिवाळीला पण करा की, ''मेरा लक्ष्य मेरा है, बडा है!''

girishjakhotiya@gmail.com

*वरील लेख भारतीय प्रताधिकार कायदा १९५७ नुसार फेरफार अथवा नक्कल निषेधित. लेखकाच्या नावानिशी हा लेख विविध समूहांमध्ये पाठविता* ♦


# विवाह इच्छुक

***Primary Information***

| | | |
|---|---|---|
| Name | : | Pallavii Madhukar Marathe |
| Date of Birth | : | 22nd July 1982 |
| Height | : | 5 ft |
| Complexion | : | Wheatish |
| Blood Group | : | B+ |

***Socio-Religious Background***

| | | |
|---|---|---|
| Religion | : | Hindu |
| Caste | : | Brahmin |
| Sub Caste | : | Koknasth |
| Star Rassi | : | Kark (Cancer) |

***Education & Professional Information***

| | | |
|---|---|---|
| Education in Detail | : | M.com, M.M.S. (Finance) |
| Employed in | : | Working in construction Firm |

*Other Details*

| | | |
|---|---|---|
| Date of First Marriage | : | 05th June 2006 |
| Date of Seperation | : | 27th August 2006 |
| Date of Divorce | : | January 2008 |

***Family Details***

| | | |
|---|---|---|
| Family Status | : | Middle class |
| Father's Occupation | : | Retired from Private Firm |
| Mother's Occupation | : | Retired from Private Firm |
| Total Brother (S) | : | |
| Total Sister (S) | : | |
| Birth Time | : | 17:07pm |
| Birth Place | : | Kolhapur, |
| Nakshtra | : | Ashlesha |
| Charan | : | Chaturth, |
| Nadi | : | Antya, |
| Gan | : | Rakshas |
| Gotra | : | Kapi |
| Address | : | 26/19, Scheme No. 6, Sector 21, Yamuna Nagar, Nigdi, Pune |
| Contact | : | 9922322727 |

# सहज सुचलेले मुक्त लेखन : अलले (अती लघु लेख)

• प्रा. संजय रामचंद्र मराठे (पृ.४१६), अमरावती भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

०१

दिडवर्षापासून व्हॉटस्‌ॲपवर विविध ग्रुप्सवर लेखकाचे नांव नसलेल्या ५/१० अलक (अती लघु कथा) फिरून फिरून फॉरवर्ड होत आहेत. काही सुंदर अलकनी मला मुरळ घातली आणि मला अललेची कल्पना सुचली. यात कथानकाची उणीव असल्याने हे अलक नाही. मी ४/५च्या तुकड्यात काही अलले व्हॉटस्‌ॲपवर टाकले पण काही कालावधी नंतर माझे नाव वगळून मलाच ते बुमरँग प्रमाणे परत येऊ लागले. म्हणून २०२०च्या दिपोत्सवमध्ये मी ते प्रसिद्ध करायचे ठरविले. आश्विन अधिक मास असल्याने प्रेम, नाटक/सिनेमा/मालिका, निसर्ग, सामाजिक मानसशास्त्रीय, शैक्षणिक, साहित्यिक अशा तीस तीन म्हणजे तेहतीस विविध वाणांच्या रुपात हा अलले संग्रह सादर केला आहे.

०२

श्रृजनात्मक शक्ती, निर्मितीसाठी प्रेरणा देते. कला आणि विज्ञान ह्या दोन्हीच्या विकासासाठी श्रृजन कारणीभुत आहे. ध्यानाच्या माध्यमातून अनेक चमत्कार दृष्टोत्पत्तीस येतात. निर्गुण निराकार ध्यान समाधीचा मार्ग आहे. सहेतुक ध्यानाने श्रृजनशक्तीचा विस्फोट साधता येतो. या स्फोटातून उन्मनी अवस्था साध्य होते. अंतःकरणात कलाकृतीचे बीज अंकुरीत होण्याचा साक्षात्कार होतो. याला विचार आणि कृतीची जोड मिळून अंतःकरणातून मनात कलाकृतीची गर्भधारणा होऊन कलाकृतीच्या अंतिम स्वरुपाची अनुभूती येते आणि कलाकृतीची निर्मिती वेग घेऊ लागते. कलाकृतीच्या कलाविष्कारातून पूर्तीची तृप्ती, धारणेत विकसीत होऊन क्षणमात्र समाधीच्या अनुभवाचे तरंग उठतात. या तरंगातून पुन्हा नवीन श्रृजनात्मक शक्तीच्या निर्मितीचे आवर्तन साकार होऊ लागते. पुन्हा नविन कला आणि विज्ञानाला पोषक वातावरण तयार होते.

०३

साहित्य हे केवळ सामाजिक कारणांचा परिणाम नसतो. तर ते सामाजिक परिणामांचे कारण ही असू शकते. फ्रेंच राज्यक्रांतीस अनेक साहित्यिकांचे उद्‌बोधक लेखन ही कारणीभूत होते. दलित साहित्य हे सामाजिक परिणामाचेच फलित आहे. असेच काहीसे व्हॉटस्‌ॲप आणि फेसबुकवरील स्माईली आणि इतर रेडिमेड चिन्हे, चित्रे यांचा मुक्त वापर करून शब्द आणि व्याकरणाची तोडफोड करणाऱ्या नविन प्रकारच्या साहित्याचा जन्म झाला आहे. समाजमनावरील संस्कार आणि संस्कृति ह्यामुळेही नवीन उपहासात्मक साहित्याची रेलचेल दिसून येते. ब्लॉगस, वॉलस्, इन्स्टाग्रामस् ह्यांनी चौकातील वार्ताफलकांची जागा बळकावली आहे. शाब्दिक वाङ्‌मयीन वादविवादाची जागा पोस्टरवार्स बळकावू पाहते आहे.

०४

सिनेमा, नाटक, मालिका ह्या प्रायोगिक आणि व्यावसायिक कलांच्या सीमारेषा पूर्वी स्पष्ट असत. आता ह्या दोन्हींना एकच छान मुलामा मिळतो, तो जाहिरातीमुळे प्राप्त व्यवसायाचा. व्यावसायिक म्हणजे प्रोफेशनल कला मार्केटींग करू लागल्या की व्यावसायिक कलांचा व्यवसाय होतो. हौशी कलांही अमॅच्युअर न राहता प्रोफेशनली व्यवसाय करताना दिसतात. मराठी वाहिन्यावरील मालिकांच्या मालकांनी प्रायोगिक, व्यावसायिक ही दरीच संपुष्टात आणली आहे. ललित साहित्यात भावनांचे आरोह अवरोह टिपले जातात, तर ललिलेत्तर साहित्याचा सर्व भार आणि भर ज्ञानात्मक अशा विचारांच्या सुसंगत व सुस्पष्ट अशा मांडणीवर असतो, हे सर्व आता, व्यवसाय कसा आणि किती झाला ही फुटपट्टी ठरवते!

०५

सुधारणा, बदल म्हटले की बंद, मोर्चे ओघाने यायला लागलेत. यांची परिणीती दंगे, जाळपोळ आणि धार्मिक जातीय रंगांच्या उधळणीत होत जाते. या हिंसक कार्यवाहीला उत्तेजनाची चरमरीत फोडणी देणारे ही असतात. तापलेल्या तेलात तडतडणारी मोहरीही असतेच. पण तापलेल्या तेलात मोहरी टाकून तडका देणारे हात मात्र नेहमी दुसरेच, सदैव पडद्यामागेच असतात. मोहरीला वाटते आपण मोहरे आहोत, पण ती प्यादी असते हे तडतडून फुटल्यानंतर करपल्यानंतर उमजते आणि त्या मोहरीचे अस्तित्व संपते. बंद, मोर्च्यासाठी पुन्हा मोहरीचे पीक येतच राहते. बंद आणि मोर्चापूर्वीच शिधा आटा, मीठ मोहरीची बेगमी जुळवणारे ही मिळतात पैसा फेकला की आपल्याकडे काहीही मिळते अगदी रस्त्यावर फेकायला कांदे, टमाटे आणि दुध सुद्धा.

०६

प्रतिक आणि प्रतिमा ह्यांना भक्तीयोगात महत्त्वाचे स्थान आहे.

प्रतिक सिंबॉल आहे. प्रतिमा अस्तित्वात दिसू शकत नसणाऱ्या निर्गुण निराकार ईश्वरावर लक्ष केन्द्रीत करण्यासाठीचे ईश्वराचे कल्पनाचित्र, संकल्पचित्र. प्रतिकाचे सोपे उदाहरण म्हणजे, सामान्य ध्वज आणि राष्ट्रध्वज. राष्ट्रध्वज जरी सामान्य ध्वजच असला तरी आपण तो राष्ट्रध्वजाचे प्रतिक म्हणून स्विकारल्याने त्याला अनन्यसाधारण महत्त्व येते. नाहीतर विठ्ठला कोणता झेंडा घेऊ हाती अशी अवस्था होते. मी राहूल सावरकर नाही हा सावरकरांच्या अपमानापेक्षा सावरकर ह्या प्रतिकाचा अपमान आहे. विचारधारा प्रतिक असते तर पुतळा किंवा फोटो ह्या प्रतिमा होत. मुर्ती फोडल्या, देवळे पाडली तरी ईश्वर हे प्रतिक मनातून कधीच नष्ट होत नाही. कल्पना शक्तीतून विविध प्रतिमा साकारता येतील. प्रतिकासाठी विचारधारा, ज्ञान, जाणीव, चिंतन वगैरे वगैरे बरेच काही लागते.

०७

सुचणे एक कला एक चान्स, मनात येणे म्हणजे सुचणे असावे का? सुचलेले क्षणिक असते हे क्षण जपून ठेवायला हवेत. त्यांना शब्दबद्ध किंवा कृतिबद्ध करण्यातून सुबक मांडणी करणे, सुचलेल्याला मूर्तरुप देणे, कालातीत असू शकते. ह्यासाठी मातृभाषा आणि संस्कार महत्त्वाचे साधन आहे. ज्या भाषेत आनंद आणि आकांत मांडता येतो ती मातृभाषा अनुभवांना चिरस्थायी रुप देऊ शकते.

०८

बिंब प्रतिबिंब, रुप-प्रतिरुप अगदी डिक्टो म्हटले तरी फरक असतोच, प्रतिबिंब पडते प्रतिरुप साकारते. कवडसा ही उजेडच असतो. प्रकाशाचा उजेड पडतोच, पण कवडश्याचे सांगता येत नाही. त्यासाठी आणखीन काहीतरी लागते. कवडश्याचे अस्तित्व मात्र प्रकाशामुळेच. उजेड भोवतालच्या अंधारामुळे जाणवतो. छाया मात्र उजेड आणि कवडसा दोघांनाही साथ देतात. संध्याछाया आणि संधी प्रकाश मात्र काहीतरी वेगळेच सुचवतात. आरश्यात रुप दिसतं पण ते सत्य असतच असं नाही. त्यात डावे उजवे होते. बघतोय तो पर्यंतच त्यात डोकावता येत. प्रतिबिंब नितळ, स्थिर पाण्यात उमटतं. प्रतिरुप, प्रतिबिंब उठून दिसण्यासाठी प्रकाश, उजेड, कवडसा काहीतरी मात्र लागतच. माणसाच्या अंतरंगाचे प्रतिबिंब गुढ असते ते पडत नाही तर दिसते म्हणतात.

०९

अलले नवीन साहित्यप्रकार आहे. जोपर्यंत समिक्षकरुपी टिकाकार त्यावर पदरचे घालुन भाष्य लिहीत नाहीत, तोपर्यंत त्याला दर्जा आहे किंवा तो घसरला आहे, असे मानता येणार नाही. साहित्याला दर्जा असतो आणि टिकाकारांच्या घसरवण्यानेच तो खरा उंचावतो, असे म्हणतात. नाहीतर लेनपूलचे पुस्तक येवढे गाजलेच नसते. टीका लिखित, शाब्दिक किंवा कृतीतून व्यक्त करण्याचा अधिकार आपल्याकडे सर्वांना आहे. त्यासाठी भाषातज्ञ, सुशिक्षीत आणि अभ्यासु असण्याची गरज नाही. येवढेच नव्हे तर ते लेखन वाचण्याचीही गरज नाही हे लेनपूल आणि नागरिक सुरक्षा सुधारणा कायदा ह्यांनी सोदाहरण स्पष्ट झाले आहे.

१०

सान्निध्यातून संपर्क. संपर्कातून जवळीक, जवळिकीतून आपुलकी, आपुलकीतून प्रेम, प्रेम म्हटले की आणाभाका, घरी सांगणे. न ऐकल्यास पळून जाणे सैराट. नाहीतर ब्रेकअप किंवा झुरणे. सफलता पदरी पडल्यास नांदणे. मग भांडणे पुन्हा ब्रेकअप नाहीतर निभावणे. ह्याला जिवन ऐसे नांव. प्रेमाला उपमा नाही, कांदेपोहे पुरतात. ते लग्न जुळवतात त्यातूनही प्रेम फुलते साकारते. कोणी नुसतेच निभावतात त्याला जुलुमाचे असेही म्हणतात.

११

दिवस संपतात. दिवस जातात. दिवस गेले हा भूतकाळ एका अर्थी वर्तमानकाळ बनतो. त्याची परिणिती नवीन जन्माच्या भविष्याचे वर्तमान बनुन येते. काही दु:खद प्रसंगोपरांत दिवस घालतात. दिवस सुखाचे तसे दु:खाचेही असतात. रात्रीचं असे नसते. रात्र तशीच सरते. कधी कधी काळोखीही ठरते. रात्र वैऱ्याचीही असते. रात्री सर्वच झोपतात. रात्री नंतर उजाडते असा आशावाद सदैव जागा असतो. दिवस आणि रात्रीला सांधणारा संधीकाळ क्षणीक असतो. सकाळ प्रसन्न, झुजुमुंज संध्याकाळच्या नशिबी कावरेबावरेपणा परिस्थीती चिटकवते!

१२

श्रद्धा, अंधश्रद्धा आणि मन:शक्ती हा वेगळाच त्रिशंकु आहे. ह्यांच्यातला थ्रेशहोल्ड म्हणजे पुसटशा रेषा ओळखता येणे ज्यांना जमले तो तरला, अन्यथा बुडला. श्रद्धापूर्वक भक्ती मन:शक्तीला पुरक. भक्ती जर अंधश्रद्धेने केली तर मनस्ताप आणि विचका. आधी हा त्रिशंकू जाणणे आणि त्यांच्या ठळक रेषा मन:पटलावर उमटवणे आवश्यक. बिटविन द लाइन्सचा उपद्व्याप नंतरचा. पुसट रेषा ओळखणे तर आणखीनच नाजूक. अंधश्रद्धा निर्मुलन वाले ती दुर होईल अशी श्रद्धा ठेऊनच कशाला तरी खतपाणी घालतात आणि श्रद्धेचे विकृत रुप म्हणजे अंधश्रद्धा हे विसरतात. ते अंधश्रद्धेकडे प्रतिक म्हणून पाहतात आणि स्वत:च्या प्रतिमा पुजतात. मुळात श्रद्धा हेच खरे प्रतिक आहे हे ह्या अंधाना कोण सांगणार? ह्यांनाच श्रद्धा आणि अंधश्रद्धेतल्या पुसट रेषा ओळखता येत नाहीत. त्यामुळे त्यांना मन:शांती न मिळता त्यांची शारिरीक शक्ती ते उगाच खर्ची घालतात.

**क्रमशः**

# माझी फॉरेनची मुशाफिरी

• श्री. उल्हास मराठे, सुरेंद्रनगर, गुजरात भ्रमणध्वनी : ९८२५२२३७३८

**आ**ज दुपारी वीणा येणार होती मी आधीच परवानगी घेतली होती. लंच नंतर मी बसनी एअरपोर्टला गेलो. फलाईट वेळेवर होती. मला पाहून वीणाला हुश्य झाले. समजा मी आलो नाही तर काय करायचे ते सर्व कळवले होते, पण सर्व कठीण होते. तो गुरुवारचा दिवस होता. आमच्या घराच्या दोन म्हाताऱ्या मालकिणी होत्या. अतिशय प्रेमळ व अगत्यशील. पण त्यांना इंग्रजी अजिबात येत नव्हते. त्याची मुलगी नाडेला मध्ये ड्रॉइंग प्रिंटर होती. तीने इंग्लिश नेव्ही सोल्जरशी लग्न केले होते. तिला इंग्लिश चांगले येत होते. दुसऱ्या दिवशी मी सकाळी फॅक्टरीला निघताना वीणाला बरोबर घेवून निघालो व फॅक्टरीचा रस्ता दाखवला. संध्याकाळी आम्ही फॅक्टरीतूनच बाहेर जाणार होतो. वीणा असेपर्यंत सर्व दिवस कोणाकडे तरी डिनरला जायचे आमंत्रण होते, फुमाऊ, शेतझी, कामबॅक व आमच्या मालकिणबाई.

शेतझींचे दुसरे लग्न होते. त्यांची पहिली बायको नाडेलातच कामाला होती व सध्यापण ती नाडेलातच कामालात्र ते टोकाला राहात होते. म्हणून ती मेट्रोने घरी जाऊन स्वयंपाकाला लागली व शेत्झी आम्हाला गाडीने घेऊन निघाले. वीणाला पॅरिस दाखवत तासाभराने त्यांच्या घरी पोहचलो. बऱ्याच गोष्टी केल्या होत्या. वीणालाही नॉनव्हेजचे वावडे नसल्याने जमले हाते. फ्रेच फॉरमॅलिटीप्रमाणे त्यांनी रॅबिट व स्पेशन वाईन असा बेत केला होता. शेत्झी आम्हाला परत घरी सोडायला येणार असल्याने तो वाईन घेत नव्हता. मी त्याला सांगीतले काळजी करु नकोस आम्ही मेट्रो ने जाऊ. तेव्हा त्याने वाईन घेतली. Rule mines Rule.

रोज कोणाकडे तरी डिनर चालूच होते. क्रोमबैककडे त्याच्या बायकोने पिझ्झा केला पण त्याचा मुलगा ६ महिन्याचाच असल्याने तीचा पिझ्झा थोडा जळला होता. आम्हाला तोपर्यत खऱ्या पिझ्झाची चवच माहिती नव्हती त्यामुळे ते पण चांगले लागले. फुमाउकडे जेवायला गेलो तेव्हा तिची Indian curry छान झाली होती व वीणानी तीला पुऱ्या करायला मदत केली. तिचे दुसऱ्यांदा दिवस भरत आले होते. आणि surprise म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळी समजले की रात्री तिला दवाखान्यात दाखल केले व तिला दुसरा मुलगा झाला होता. त्यानंतर तिसऱ्याच दिवशी संध्याकाळी आम्ही सर्व एका बागेत फिरायला गेलो होतो. ती दोन्ही मुलांना घेऊन उत्साहाने आली होती. धन्य त्यांचा उत्साह...

एका दुपारी मालकीण बाई आणि मंडळ आमच्या घरात शिरले आणि वीणाला त्यांनी साडी नेसून दाखवायला सांगितले. सर्वांनी तिच्याकडून शिकून घेतल्यावर संध्याकाळी जेवायचे आमंत्रण देऊन गेल्या.

आम्हाला व्हेज जास्त आवडते म्हणून त्यांनी पालकची भाजी, भात वगैरे बेत केला होता. नंतर ग्रुप फोटो झाले. तोपर्यत माझे केस खूपच वाढलेले होते.

नंतर १५ ऑगस्टला इंडियन एम्बसीमध्ये सर्वाना बोलावले होते. जरा इंडियन पब्लिक भेटेल म्हणून मी मुद्दामहून गेलो. सर्वांची व अंबॅसिडरचे भाषण झाले. सर्वानी एकमेकाना शुभेच्छा दिल्या व जनगणमन साठी सर्व उभे राहीले. खेदाची गोष्ट म्हणजे त्यांनी टेप केलेली राष्ट्रगीताची रेकॉर्ड काही वाजेना. सर्व एकमेकांकडे बघत राहीले. मी विचारले मी म्हणू का? सर्वानी लगेचच होकार दिला व संघ शिस्तीत मी जनगणमन ... भारत माताकी जय पर्यंत म्हंटले. मला थांबवून त्यांनी माझे आभार मानले व नंतर एक ऑफिशीयल पत्र पण घाडले, माझे मन अभिमानाने भरुन आले.

तसेच गोकुळाष्टमीला हरे राम हरे कृष्ण मंदीरात उत्सव असतो. म्हणुन रात्री गेलो होतो. Arck du tubuerच्या जवळच देऊळ आहे. खूप मोठ मंदीर आहे. मृदुंग आणि टाळ घेवून बोबडया आवाजात सर्व भगवी वस्त्र नेसून नाचत गात होते. बराचवेळ नाचल्यावर मग श्री कृष्णाची आरती व प्रसाद झाला. आम्ही ३-४ इंडियन्स होतो. एक हैद्राबादचा डॉक्टर एक पूजवस मधल्या थेटरचा मालक पंजाबी होता. व मी मराठी. ती लोक विचार होती तुम्ही मथुरेला जाऊन आला आहात का? द्वारकेला गेला होता का? मी दोन्ही ठिकाणी जाऊन आलो आहे हे समजल्यावर ते लोक मला नमस्कार करु लागले. म्हणाले तुम्ही तर खूपच सिनियर आहात. शेवटी भजन सांगितले. हरी बोल हरी बोल, केशव माधव गोविंद बोल. खरच त्याना श्रीकृष्ण किवा राम समजले आहेत का?

आता आम्ही जर्मनी व यु.के.च्या ट्रीपचा प्लॅन करत होतो.

रोज कोणाकडे तरी जाणे चालले असल्याने तिकीट काढणे मला जमत नव्हते. मग मी वीणालाच ट्रॅव्हल एजंटचे दुकान दाखवले व तिला चौकशी करायला सांगीतली. मग शेवटी सर्व प्रोग्रॅम फायनल केला. प्रथम ट्रेन ने Akhenला माझा Telco मधील जुना मित्र मनोहर पाटील सपत्निक रहात होता. एक दिवस त्याच्याकडे राहून दुसऱ्या दिवशी लंडन ला जाणार होतो. आश्चर्य म्हणजे तेव्हा आमच्याकडे फ्रांस शिवाय कोणताच व्हिसा नव्हता. नाडेला ने मला एक पत्र दिले होते की श्री मराठे आमच्या इथे ट्रेनींग घेत आहेत व तारखेला परत फ्रांस ला येणार आहेत. मनोहर आम्हाला गाडीवर घेण्यास आला होता. तो तिथल्या युनिर्व्हसिटी मध्ये मास्टर करत होता व जोडीला तिथे काम करुन पैसा कमवत होता. रात्री उशीरा पोहचलो अखेन जर्मनी आणि बेलझीयमच्या बॉर्डरवर आहे. जर्मनीतली सर्वात चांगली युनिर्व्हसिटी इथे आहे. सकाळी सौ. वीणानीच आमच्यासाठी ब्रेकफास्ट केला. मनोहरची बायको मुंबईला बाळंतपणासाठी गेली होती. नंतर त्यानी आम्हाला त्याची युनिर्व्हसिटी बाहेरुन दाखविली. दुपारी त्याचा एक मित्र कलीग सोबत आम्ही एक खेडे पहायला गेलो. हे खेडे दुसऱ्या महायुध्दात संपूर्ण उध्वस्त झाले आणि आजपण त्याच कंडिशनला ठेवले आहे. तिथे थोडी हॉटेल व कॉफी शॉप शिवाय काहीच नाही पण परिस्थिती वरुन त्या वेळच्या झालेल्या युध्दाची कल्पना येते. आम्ही काही प्रवास गाडीनी इस्ट जर्मनीच्या अधिपत्याखलील भगातून केला तेव्हा आमच्या गाडीच्या डब्यांना बाहेरुन कुलुपे लावण्यात आली व जेव्हा परत वेस्ट जर्मनीला पोहचलो तेव्ही ती काढण्यात आली. अजूनही ईस्ट जर्मनीचा दरारा आहे पण ईस्ट व वेस्ट जर्मनीमध्ये जमीन आसमानाचे अंतर आहे.

नंतर आमची गाडी जर्मनीहून लंडनला जाणर होती. तेव्हा समुद्रातून रस्ता नव्हता. लाल बंदरातून गाडीचे ७ डबे बोटीवर चढवण्यात आले व आम्हाला डब्यातून खाली उतरवले. सर्वांना डेकवर नेण्यात आले. सुमारे १.३० तासाचा प्रवास डेकवर एन्जॉय केला. तिथे खायची प्यायची सोय होती. परत डारव्हला गाडीत बसलो व गाडी लंडनला रवाना झाली. आम्हाला कल्पनेपक्षा खूपच उशीर झाला. लंडनला पोहचलो तर रात्रीचे १२ वाजले होते. एक मराठी आमच्या काकांचे मित्र होते त्यांच्या घरी आमची उतराची सोय झाली होती. पण फारच उशीर झाल्याने आम्हाला फार संकोच झाला होता. पण त्यांना फोन करण्याशिवाय काहीच उपाय नव्हता. शेवटी ते न्यायला आले. त्या नंतर भूक असूनही आम्ही काही न खाता पिताच झोपलो. एकूणच आदरातिथ्य बेताचेच झाले. दुसऱ्या दिवशी आम्ही त्यांना सांगितले की आम्ही दोन दिवसासाठी आलो आहोत तर लंडनमध्ये काय काय बघता येईल. यावर त्यांचे उत्तर फारच विचित्र होते. दोन दिवसात काय पहाणार? आम्ही कोणी ब़रोबर येऊ शकत नाही. तुम्ही तुमचे मॅनेज करा. आमची फारच कुचंबणा झाली. मग मी एकटा बाहेत पडलो. काही टुरीस्ट बस किंवा ट्रॅन शॉप शोधण्यासाठी. पण माझ्या मनात एक कल्पना आली व मी मला पॅरीसला भेटलेल्या पटेलांना फोन केला ते माझ्यावर उखडलेच. म्हणाले तुम्हाला आमच्या घरी उतरायला सागितले होत पण तुम्ही दुसरीकडे का उतरलात? आता कुठे आहाते ते सांगा व तिथेंच मी तुम्हाला घ्यायला येतो. १५ मिनीटात श्री पटेलांचा धाकटा भाऊ आम्हाला घ्यायला आला त्याच्या मर्सिडिज कार ने आम्ही सर्व सामान घेऊन मराठी मित्राचा निरोप घेऊन निघालो. त्यांच्या वहिनींनी आमच्या नाश्त्याची जोरदार तयारी केली होती. शेव, गाठया, गोडाचा शिरा, मसाला चहा. आम्ही १ दिवसाचा उपासच सोडला व तृप्त होऊन आंधोळी आटपून त्यांच्या भावाबरोबर लंडन पहायला निघालो. प्रथम त्यांनी गाडीूनच सर्व गोष्टी दाखविल्या व नंतर tratalga square, Bankingham Palace Madam Tusa Musium दाखविले. एका इंडियन रेस्टॉरंटमध्ये जेवायला घातले, कुठेही माझा हात खिशात जाऊ दिला नाही. सध्याकाळी त्याच्या सर्व कुटुंबियांसोबत जेवलो. त्यांचे मोठे जॉईट कुटुंब हाते. दोन भाऊ, भाभी, सुन मुलगा नुकतेच लग्न झालेले होते, त्याच्या सोबत गप्पा गोष्टी व त्यांच्या पॅरीसच्या टूरच्या आठवणी काढीत बराच वेळ गेला. नंतर त्यानी वीणाला साडी व मला परफ्युम, दीपासाठी कपडे दिले. दुसऱ्या दिवशी सकाळी पटेल बाई आम्हाला खरेदीला घेऊन गेल्या. स्वस्त व मस्त मिळेल अशा बऱ्याच जागा त्यांनी दाखवल्या. दुपारी जेवणानंतर त्यांचा निरोप घेऊन आम्ही परत पॅरिसला निघालो ते रात्री १० वाजता पॅरिसच्या घरी पोहचलो. लंडनला जाताना वीणा डेकवर पडली व तिच्या हाताच्या बोटाला मुका मार लागला होता. दुसऱ्या दिवशी म्हाताऱ्यांना समजल्यावर त्या वीणाला केमिस्टकडे घेऊन गेल्या व मलम पटटी करून आल्या. लंडनहून येताना वीणा डाळीचे पीठ, मसाले वगैरे गोष्टी घेऊन आली होती. मग आम्ही दुसऱ्या दिवशी माझ्या फॅक्टरीतल्या काही लोकांना घरी नाष्टयाला बोलावले. फ्रेंच लोकांना बटाटा खूप आवडतो पण ते बहूतेक नुसताच उकडलेला खातात. वीणानी बटाटयाचे वडे, चटणी व शेवयाची बदाम घालून खीर केली होती. मंडळी झणझणीत खाऊन खुष झाली. सर्वांना घरी बोलावयाची इच्छा पूरी झाली.

पुढील आठवडयात मला नाडेलाच्या दुसऱ्या प्लॅन्टला

साउथ फ्रांसला जायचे होते व तिथून आल्यानंतर परत इडियाला निघायचे होते. वियाझोला माझे चांगलेच स्वागत झाले. इथे निडल रोलर म्यॅन्युफॅक्चरींग प्लॅन्ट आहे. हा माझा ट्रेनिंगचा भाग नव्हता पण तेव्हा नजरेखालून घालणे हा एकच उद्देश होता. तिथे संध्याकाळचया पार्टीला आम्ही एका वाईन फॅक्टरीला गेलो होतो. त्यांनी मला कोणती वाईन घेणार विचारले व १५ नावे सागितली. मला काहीच माहित नव्हते. पहिली वाईन मी पॅरीस टूरला घेतली होती. त्यामुळे मला रेड व व्हाईट वाईन या पलिकडे काहीच माहित नव्हते. मी त्यांना त्या गावची स्पेशल जी असेल ती द्या म्हंटले. मग आम्ही चक्कर मारुन येईस्तोवर त्यांनी वाईन आईस पॉट मध्ये ठेवली होती. त्या वाईन बरोबर खायचे चीज व बेड सर्व मॅचिंग गोष्टी तयार होत्या. दुसऱ्या दिवशी त्यांचा निरोप घेऊन आम्ही परत पॅरीसला आलो व दुसऱ्याच दिवशी इंडियाला परत आलो. अशी माझी पहिलीवहिली परदेश टूर पूर्ण झाली. आता या गोष्टीला फार वर्षे झाल्यामुळे खूप गोष्टी लिहिल्या तरी खूप राहूनही गेल्या आहेत.

*क्रमश:*


# वधू-वर विवाह मंडळ

मी सुधाकर (बाळ) मराठे राहणार
अष्टविनायक सोसायटी बिबवेवाडी, पुणे,
माझे स्वत:चे मोफत
**वधू वर विवाह मंडळ** असून,
माझ्याकडे सर्व ब्राह्मण पोटशाखांतील
स्थळे आहेत, तसेच घटस्फोटीत
(अपत्य, विनापत्य) स्थळे आहेत.
इच्छुकांनी संपर्क साधावा,
फोन नं.: ०२० २४२१०१९८ आणि
८३७८९ ६७४३७
(सौ. सुनिता – पत्नी, आणि
९८२२३ २९७७० मी स्वत:)


## वाचकांचा पत्रव्यवहार

प्रति,
डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे
संपादिका 'हितगुज' मुंबई ४०० ०३१.
मा. संपादिका,

पत्रास कारण की माझे जून २०२० पासून आपल्या 'हितगुज'चा अंक प्रतिष्ठानच्या वेबसाइटवर उपलब्ध असतो व वाचला पण. पोस्टाने येणाऱ्या छापील अंकाची जी मजा असते ती वेबसाइटवर नाही हे नक्की. पण कालाय तस्मै नमः सप्टेंबरच्या २०२० च्या अंकातील प्रवास वर्णने खूपच छान रंगली आहेत.

दुसरे असे की, 'आम्ही म्हातारे' या विषयी मराठे जनात जास्त रस दिसत नाही. गेल्या दोन्ही अंकात एकही लेखन उपलब्ध नव्हते. बहुतेक मराठे जनतेला वृद्धत्व पसंद नसावे. छानच आहे. पण मी ७-२-२०२०ला आपल्याकडे पाठविलेल्या या विषयावरील लेखाकडे मात्र दुर्लक्ष झालेले दिसते. कारण माझा लेख जून २०२०च्या अंकात येणे अपेक्षित होते. व आपण फोनवरही तसे बोलला होतात. तरी माझा लेख डिसेंबरच्या अंकात छापला जाईल अशी अपेक्षा व विनंती.

पुढे असे की, मी या सोबत एक लेख व एक चारोळी पाठवत आहे. हा लेख माझ्या नातवाच्या हस्ताक्षरात आहे. तरी त्याकडे लक्ष असावे. ह्या लेखामधे माझे काही नाही. मी माझ्या आत्मबुद्धीने अनुवादीत केला आहे. श्री माता पार्वतीच्या अलंकाराचे ही असेच वर्णन आहे. ते पुढे कधीतरी.

तरी सोबत लेख आपल्या पसंतीस पडला व योग्य असला तर आमच्या 'हितगुज'मध्ये स्थान द्यावे, ही विनंती.

मराठे प्रतिष्ठानचा शुभेच्छूक
**मोरेश्वर मराठे**



*भस्मांकित तनू, रम्य सावळी*
*गंगा वाहे शिरी, नेत्र कपाळी*
*चंद्रकोर शोभे, सर्प वेढे गळी*
*निळकंठ विशहारी जनताप जाळी*

**मोरेश्वर मराठे**, *सांगली*

**आयुष्याने एवढा अनुभवाचा खजिना देऊन संपन्न केल्यानंतर, रोज जमाखर्चाची मांडणी करणं सोडून द्यावं.**

# कृष्णराव मराठे

• प्र. श्री. कोल्हटकर

*अंक : वाङ्मय शोभा – सप्टेंबर १९६०*

**लेखाबद्दल थोडेसे :** व्यक्तिचित्रणात्मक लेखनासाठी प्र. श्री. कोल्हटकर यांचे नाव का घेतले जाते हे आपल्याला हा लेख वाचून कळेल. व्यक्तिचित्रण करताना ज्या व्यक्तिविषयी लिहायचे आहे, त्या व्यक्तीच्या प्रेमात पडायचे नाही किंवा विरोधातही भूमिका घ्यायची नाही. त्या व्यक्तीमध्ये असलेले गुण–अवगुण या दोन्हीचा परामर्ष घ्यायचा. मुख्य म्हणजे त्या व्यक्तीच्या स्वभाव वैशिष्ट्यांपासून तर शारिरीक वैशिष्ट्यांपर्यंत सर्वच पैलू त्यात रसाळपणे यायला हवेत. अश्लीलमार्तंड कृष्णराव मराठे यांच्यावरील या लेखात हे सगळे गुणविशेष मौजूद आहेत.



कृष्णराव गोविंद मराठे
(पृ. ४६१)

पुणे येथे वास्तव्य असलेले कृष्णराव मराठे महाराष्ट्र ब्राह्मणसभा, अभ्युदय मंडळ इत्यादी संस्थांचे चिटणीस होते. तसेच पुणे येथील संस्कृतिसंरक्षक मंडळाचे एक प्रमुख कार्यकर्ते होते. ते सामाजिक आणि नैतिक विषयांवर व्याख्याने देत. वाङ्मयातील अश्लीलता आणि ग्राम्य विनोद नाहीसा करण्यासाठी ते प्रचारकार्य करत. जिथे कुठे काही लैंगिक लिखाण असेल, उल्लेख असतील तिथे मराठे त्वेषाने तुटून पडायचे. यातून त्यांनी अत्र्यांसारखे बलाढ्य शत्रू, आणि कर्व्यांसारखे ऋजू शत्रू निर्माण केले. ते शेवटपर्यंत लढत राहिले. त्यांच्या या लढावू स्वभावाचे चित्रण यात अतिशय रसाळ भाषेत आले आहे. साठ वर्षांपूर्वीचा हा लेख व्यक्तिचित्रणातला अमोल ठेवा आहे.

****

कै. कृष्णराव मराठे यांच्यासारखी एखाद्या नैतिक मूल्यांसाठी जिद्दीने जिवाचे रान करणारी माणसे ही समाजाची भूषणे होत. त्यांचे यथार्थ शब्दचित्र प्र. श्री. कोल्हटकर यांनी लिहिलेल्या (प्रकाशन–१९४२) ऋणाबंधी या पुस्तकावरून उधृत करीत आहोत.

अंगाने काटक, कमरेला पंचा, अंगांत गुंड्या असलेला किंवा नसलेला सदरा, डोक्यावर टोपी, पायांत तुटक्या वहाणा आणि डोळ्यांत कमालीचा मिस्किलपणा अशा थाटाचा उंचसा म्हातारा पुण्यांतील टिळक रोडवरील भाऊ कॉलेजच्या कोपऱ्यावर गवत विकणाऱ्या माणसाबरोबर सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास भाव ठरवितांना सांपडला, तर त्याच्या पाठीवर कृष्णराव मराठे म्हणून, आपल्या बोटांना फारशी इजा होणार नाही अशा बेताने थाप मारायला हरकत नाही. तो तुमचे स्मित–वदनाने स्वागत करील, गवताच्या महागाईबद्दल चार शब्द बोलेल आणि जवळ उभ्या असलेल्या आपल्या गाईचे दावे धरून घराकडे चालू लागेल. रस्त्यांत कोणी ओळखीचा मनुष्य भेटलाच तर ही स्वारी हसतमुखाने त्याच्याकडे पाहील आणि पुन्हा नाकासमोर चालू लागेल. याच स्वारीला उभा महाराष्ट्र 'अश्लील मार्तंड मराठे' म्हणून ओळखतो.

मराठी वाङ्मयांत लेखनाचा काही पराक्रम न करताही, चांगला नांवलौकिक कमावणारे हे गृहस्थ कोणालाही आवडतील. जुन्या बाळबोध घराण्यांत त्यांचा जन्म झाल्याने त्यांच्या आयुष्याला सहाजिकच जुनी शिस्त लागली. लहानपणापासून त्यांना तालमीचा नाद लागल्याने वृत्तीप्रमाणे त्यांचे शरीरही पिळदार बनले. ते चहा पीत नाहीत, विड्या फुंकीत नाहीत आणि हॉटेलमध्येही जात नाहीत. निर्व्यसनी मनुष्य पाहिला म्हणजे मला त्याची कींव करावीशी वाटते, आणि इतके रुक्ष आयुष्य खरोखरीच आनंदाने जगण्यासारखे असते की नाही असा मला प्रश्न पडतो. त्यांच्या मुलांनाही हीच कडक शिस्त लागली असल्याने वडिलांप्रमाणे तीही अगदी निर्लेप आणि सोंवळी आहेत असे कृष्णराव मोठ्या अभिमानाने सांगतात. खालपासून वरपर्यंत सर्वांचीच अशी वृत्ती असल्याने त्यांच्या घरांत अस्सल मवाळग्रंथी साधेपणाचा मामला असल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. लोखंडी पट्ट्यांचा एक पलंग त्यांच्या 'दिवाणखान्यां'त अहोरात झोपा घेत पडलेला असतो. एखादी खुर्ची एखाद्या कोपऱ्यांत जगाकडे पाठ करून माणसांतून उठल्याप्रमाणे अस्ताव्यस्तपणाने ठाण मांडून बसलेली दिसेल. कृष्णरावांच्या घरी असलेल्या खुर्च्या बसायला अतिशय गैरसोयीच्या असल्याने, त्या बहुधा

उन्नतिउत्कर्षाच्या भट्टीतून तावून सुलाखून आलेल्या असाव्यात असे वाटते. एका कोपऱ्यांत डाव्याच पायाच्या दोन वहाणा पाहून कृष्णारावांना दोन्हीही डावे पाय आहेत, की काय हे मी हळूच चोरून पाहिले. खुंटीवर अव्यवस्थितपणाने कपडे टांगलेले दिसले तरी, त्यांत जनानी कपड्यांची गल्लत झालेली दिसून आली नाही. रंग गेलेल्या भिंतीवर काही बोधवचने पहाणाऱ्याला सापडतील. एकंदरीने अशा 'बालबोध' थाटांत साहित्यसृष्टीतील हा फुकट फौजदार रोज दुपारी मराठीतील अश्लील लेखनाचे गाठोडे घेऊन गुन्हेगाराच्या शोधात गढून गेलेला आढळतो. गृहस्थाश्रमाला शोभणारे आदरातिथ्य कृष्णरावांमध्ये भरपूर असल्याने, मला कधी लाडू तर कधी सरबत मिळते. निर्मल मन, निर्मल चारित्र्य आणि थोडा विनोदी स्वभाव असा मजेदार बनाव कृष्णरावांमध्ये झालेला असल्याने मला त्यांच्याशी तास अर्धा तास गप्पा मारायला फार आवडते. दुसऱ्याची गैरसोय करण्याइतका हा गृहस्थ सनातनी नाही किंवा स्वतःची कुचंबणा करून घेण्याइतका सुधारकही नाही. कृष्णरावांचा वाङ्मयांत चालू असलेला उद्योग आणि वर्तमानपत्रांत होणारी त्यांची संभावना पाहून हा गृहस्थ तापट किंवा चक्रम असावा असे एखाद्याला वाटण्याचा संभव आहे. पण खरा प्रकार अगदी निराळा आहे. स्वारी अगदी थंड वृत्तीची असून प्रतिस्पर्ध्याशी खेळीमेळीने दोन हात करायला एका पायावर तयार असते, ही गोष्ट त्यांचा परिचय झाल्यावर प्रत्येकाच्या मनाला पटू लागते.

माझी व कृष्णरावांची पहिली भेट, मला वाटते, नागपूर साहित्य संमेलनाचे वेळी नागपूर मेलमध्ये झाली. त्यांच्या सामानात अश्लील वाङ्मयाचे आणि त्यावरील ठरावाचे बोचके होते ही गोष्ट नंतर मला समजली. १९३१ साली समाजस्वास्थ्याचा एक अंक वाचीत असतां त्यांतील मजकुराने कृष्णारावांचे मनःस्वास्थ्य एकाएकी बिघडले आणि अश्लील वाङ्मयाच्या भुताने त्यांना चांगले पछाडले. समाजस्वास्थ्यासारख्या शास्त्रीय विषयाला वाहिलेल्या मासिकांतील मजकूर जरा चमत्कारिक असला, तरी तो अश्लील नसतो असे अनेकप्रमाणे माझेही मत आहे. कर्व्यांनी ते मासिक उच्च ध्येयाने काढले असून त्यासाठी त्यांनी स्वार्थत्यागही केला आहे. लैंगिक विषयांवर त्यांत लेख येणे अपरिहार्य असले तरी ते मासिक अश्लील चौकटींत खासच बसत नाही. तरी पण त्या मासिकाच्या वाचनाने अनिष्ट वाङ्मयाला गाडून टाकण्याचा त्यांनी विडा उचलला. (या अर्थाशिवाय, विड्याचा आणि कृष्णरावांचा संबंध कधीच आलेला नाही!) तेव्हांपासून प्रत्येक साहित्य संमेलनांत आपला आवडता ठराव मांडून त्यांनी सर्वांना सळो की पळो करून सोडले. नागपूरला या ठरावांवर मुख्य भाषण करण्याची जबाबदारी कृष्णरावांच्या दुर्दैवाने कमलाबाई किबे यांजवर सोपविण्यात आली. त्या प्रसंगी (हो, प्रसंगच नाही तर काय?) आपल्या लौकिकाला साजेल असे अचाट पराक्रमी 'खंजिरी' भाषण करून बाईंनी सर्वांना कसे चकित केले याचा इतिहास प्रत्येकाला माहित आहेच. परंतु बाईंच्या भाषणांतील खंजिराचा एक निसटता वार ठरावाला लागून तो पसार होण्याऐवजी त्या बिचाऱ्याला जीव मुठीत घेऊन संमेलनातून पळ काढाला लागला. तरी पण कृष्णरावांचा धीर खचला नाही. त्यांनी आपला जखमी ठराव अखेरीस बडोद्याला पास करून घेतलाच; आणि आपण या कटकटींतून कायमचे सुटलो अशा गोड कल्पनेने साहित्यिकांनी समाधानाचा सुटकारा सोडला. पण! अफसोस, त्यांचा तो आनंद अल्पजीवी ठरण्याचा विधिसंकेत होता. कारण म्हाताऱ्याला याच सुमाराला पावित्र्य विडंबनाचा ठसका लागून कृष्णराव पुन्हा महाराष्ट्राच्या मागे लागले. सिनेमा आणि ग्रामोफोन रेकॉर्डस् यांकडे त्यांनी आपला मोर्चा वळविला.

एरव्ही ब्रँडीच्या बाटलीच्या चुकूनही वाटेस न जाणारे कृष्णराव, त्या नावाच्या सुंदर बोलपटाच्या मागे लागले आणि त्यांनी त्यांतील शंभर फुटांचा भाग का व कसा उडविला हे आता सर्वांना ठाऊक आहेच. रामसीतेची टिंगल असलेली एक रेकॉर्ड हिंदूंच्या धर्मभावना दुखविणारी आहे अशी तक्रार कृष्णराव लवकरच सरकारपर्यंत भिडविणार आहेत असे मला कळले. मी ती रेकॉर्ड ऐकलेली नसल्याने कृष्णरावांची तक्रार वाजवी आहे की नाही हे मला आताच सांगणे शक्य नाही. परंतु कृष्णराव म्हणतात तसा प्रकार खरोखरच असेल, तर त्या कंपनीने ती रेकॉर्ड बाजारांतून काढून घेणे शहाणपणाचे ठरेल असे मला वाटते. विनोदाच्या नावाखाली देवादिकांची चेष्टा करायची खुमखुम त्या कंपनीला असेल, तर तिने इतर धर्मांतील देवांना जरा आपल्या दिव्य विनोदांच्या तडाख्यांत आणून तशी रेकॉर्ड बाजारांत आदळून काय गंमत होते हे पहावे. सीता, सावित्री, द्रौपदी यांसारखी उज्ज्वल रमणीरत्ने पावित्र्याची प्रतीके म्हणून आमच्यासमोर आज हजारों वर्षे प्रतिष्ठेने वावरत असता, त्यांच्याशी एखाद्या धटिंगणाने विनोदाच्या नावाखाली अतिप्रसंग करावा हे कृष्णरावांनाच काय पण कुणालाही मान्य होणार नाही. विनोदनिर्मितीसाठी इतर हजारो विषय असतांना थोर स्त्री-पुरुष आणि देवदेवता यांच्या वाटेस जाण्याचे वास्तविक कुणालाही कारण नाही. समाज कितीही बुद्धिजीवी झाला तरी आदराची आणि भावनेची अशी काही स्थाने असतात. या सर्व गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट असतांना, त्या आमच्या लक्षांत आणून देण्यासाठी एखाद्या कृष्णराव मराठे लागावा हे समाजाचे दुर्दैवच म्हटले पाहिजे.

कृष्णरावांची व माझी ओळख होण्यापूर्वी उचापती करण्याच्या त्यांच्या स्वभावाबद्दल माझा बराच गैरसमज झालेला होता.

साहित्यसृष्टीत प्रसिद्धीच्या क्षेत्रांत वाटेल त्याला सहज रीतीने चरता येते. म्हणून हे गृहस्थ सगळ्यांचा डोळा चुकवून या फंदांत पडले असावे असे मला पहिल्यापहिल्याने वाटे. तसेच 'पेणसली'त निघाल्यावर तन्दुरुस्तीसाठी काही तरी चाळा असावा म्हणून हा उद्योग कृष्णरावांनी आपल्यामागे लावून घेतला असावा अशी समजूतही काही लोकांची अजून आहे. मराठीतील झाडून सारे अश्लील वाङ्मय राजरोसपणाने वाचायला मिळावे म्हणूनच या भल्या गृहस्थाने ही खटपट चालविली आहे असेही काही चावट लोक म्हणतात. परंतु त्यांचा आणि माझा परिचय वाढल्यानंतर माझा सर्व गैरसमज दूर होऊन कृष्णरावांचा हा भगीरथ प्रयत्न अत्यंत प्रामाणिकपणाचा आहे अशी माझी खात्री झाली. निंदास्तुतीची पर्वा न करता एखाद्या मिशनऱ्याला शोभेल अशा वृत्तीने ते आपले कार्य करीत आहेत. लोक त्यांची इतकी चेष्टा करतात, की त्यांच्याऐवजी दुसरा एखादा तापट मनुष्य असता तर त्याच्या कार्याचे तीन तेरा केव्हाच झाले असते.

परंतु आज इतकी वर्षे खटपट करूनही कृष्णरावांना आपल्या कार्यात यश का आले नाही, हा प्रश्न उरतोच. त्यांनी लोकमत तयार करण्याचा प्रयत्न करूनही मराठी वाङ्मयात अनिष्ट वाङ्मयाचे प्रवाह पूर्वीप्रमाणे जोरात चालू आहेत. याचे मुख्य आणि महत्त्वाचे कारण म्हणजे कृष्णरावांनी तरुण पिढीला पूर्णपणे विश्वासांत घेतले नाही हे होय. अनिष्ट वाङ्मय वाचण्याकडे तरुण पिढीचा विशेष नैसर्गिक ओढा कां आहे हे जाणून घेण्याचा सहानुभूतीचा प्रयत्न कृष्णरावांनी केला नाही, असे मला वाटते. तरुण पिढीकडून कोणतेही कार्य करून घ्यावयाचे असेल तर तिला आंजारून गोंजारून ते साधून घेतले पाहिजे. बदलत्या काळाबरोबर जागतिक विचारक्रान्तीचा परिणाम आमच्या तरुण तरुणींच्या मनावर झाला असल्यास त्यात नवल नाही. या युद्धाने तर आचारविचार आणि नीति-अनीतीच्या कल्पना यांवरही फार मोठा परिणाम होणार आहे. तरी पण त्याने गांगरून न जाता, त्याबद्दल तरुण पिढीचा धिक्कार न करता, नवविचारांच्या बेफाम पुराचे पाणी नीट गाळून प्यावे असे प्रचाराने तरुण पिढीला सांगून तिला विश्वासांत घेणे कृष्णराव आणि सज्जन विचारवंतांना करणे अपरिहार्य होईल. उदाहरणार्थ, संततिनियमनसारखा प्रश्न मी घेतो. अनिष्ट वाङ्मयाचे खाद्य समोर असतां कृष्णरावांनी हा विषय उष्टावला नसता तरी चालण्यासारखे होते. त्यामुळे तरुण पिढी थोडीशी बिचकून कृष्णरावांच्या खऱ्या कार्यांकडेही सहानुभूतिजन्य नजरेने पाहू लागती.

कृष्णरावांनी तरुणतरुणींची उपेक्षा करून त्यांना आपल्या विचारांच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला नाही असे मला वाटते. तरुणांच्या अड्ड्यावर ठिय्या मारून बसण्याऐवजी त्यांनी आपला डेरा विश्राम मंडळासारख्या कुचकामी वृद्धांच्या दिवाणखान्यांत ठोकला. आपल्या कार्याची महती वृद्धांना सांगणे हे, गोरक्षणाचा संदेश हिंदु लोकांना पटविण्याइतके मुत्सद्दीपणाचे आहे असे मला वाटते. फार काय, पण दिशाभूल झालेल्या अनिष्ट लेखन करणाऱ्या काही तरुण लेखकांना विश्वासांत घेऊन त्यांच्यावर आपल्या कार्याची थोडीशी जबाबदारी कृष्णरावांनी टाकली असती, तर त्या प्रयोगांत त्यांना थोडे तरी यश आले असते असे मला वाटते. चोराच्या हाती जामदारखान्याच्या किल्ल्या देणे काही वेळेला तरी शहाणपणाचे ठरते हे कृष्णराव जाणतातच. तसेच 'अनिष्ट लेखन समालोचन समिती' (अरे बापरे!) या प्रचंड संस्थेमार्फत नवयुग, झंकार, मौज वगैरे पत्रांवर ठराव पास करून घेणे याचाही फारसा उपोयग होईलसे मला वाटत नाही. अत्रे-फडक्यांनी कितीही अनिष्ट लेखन केले तरी ते तरुण पिढीचे आवडते लेखक आहेत. त्यांना वठणीवर आणावयाचे असले तर त्यासाठी त्यांना तरुण पिढीकडूनच तसला आदेश द्यावा लागेल. थोडक्यांत म्हणजे, कृष्णरावांनी यापुढे तरुण पिढीला मान्य होणार नाही अशी एकही नवी आघाडी निर्माण करून आपली मर्यादित शक्ती खर्च करू नये असे मला वाटते.

दुसरी गोष्ट म्हणजे कृष्णरावांच्या हातून साहित्यसृष्टीत भरीव असे कोणतेच कार्य झालेले नाही. त्यांच्या खात्याला उत्कृष्ट आणि इष्ट वाङ्मय जमा असते, तर अनिष्ट वाङ्मयावर त्यांना जास्त अधिकारवाणीने बोलता आले असते. ते उत्तम वक्तेसुद्धा नाहीत असे मला वाटते. म्हणजे तरुण पिढीला जवळ करण्याचे एकही वशीकरण यंत्र त्यांच्यापाशी नाही. कृष्णरावांच्या कार्याबद्दल बापुसाहेब माट्यांना फार जिव्हाळा वाटतो याबद्दल वाद नाही. पण अधूनमधून कृष्णरावांच्या हाताला हात लावून 'मम' म्हणून त्या कार्याशी औट घटकेचा संसार करण्यापेक्षा माट्यांनी आपले शक्तिसर्वस्व त्यासाठी वेचण्याचे ठरविले तर या प्रश्नाकडे चावटपणा म्हणून लोकांचे लक्ष न जातां ते त्याचा गंभीरपणाने विचार करू लागतील. लेखणी आणि वाणी यांवरील माट्यांचे प्रभुत्व लक्षात आणता, इतका लायक दुसरा गृहस्थ या कार्यासाठी मिळणे अशक्य आहे, असे खुद्द कृष्णरावही कबूल करतील. कृष्णरावांत मुजोरी असली तर माट्यांत वक्तृत्व आहे.

कृष्णरावांना लिहिता येत असेल तर माटे हे प्रथितयश लेखक आहेत. कृष्णराव साधी व्यक्ती आहे तर माट्यांमध्ये ढंगदार व्यक्तित्व आहे. कृष्णरावांचा व तरुण पिढीचा प्रत्यक्ष संबंध येत नसला तर माट्यांच्या हाताखालून प्रतिवर्षी हजारो विद्यार्थी जात असतात. सनातनी सुधारक या नात्याने माटे हे नव्या जुन्या पिढीतील महत्त्वाचा दुवा आहेत. अस्पृश्यांच्या बाबतीत त्यांनी फार महत्त्वाचे कार्य केले असल्याने तरुण

पिढीला त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटतो. या सर्व गुणांबरोबर माट्यांचे काही दोषही आपद्धर्म म्हणून कृष्णरावांना पत्करावे लागतील. वादाच्या आखाड्यांत थंडपणाने सदभिरुचीच्या मर्यादेत माटे खेळीमेळीने वागतीलच हे सांगणे जरा धाडसाचे होईल. अत्र्यांवर वेळी अवेळी गुरगुरणारे माटे, असभ्य वैयक्तिक टीका करणाऱ्या एखाद्या धंदेवाईक साप्ताहिकाशी झटपट 'अक्सिस' कसा करू शकतात हा अशक्य चमत्कारही पहाण्याची पाळी दुर्दैवाने महाराष्ट्रावर आली आहे. स्वतः दुसऱ्यांवर टीका करण्याची त्यांना हौस असली तरी स्वतःच्या बाबतीत मात्र ते फारच हळुवार वृत्तीचे झाले आहेत. माट्यांच्या एखाद्या प्रामाणिक टीकाकाराला त्यांच्या लाडक्या पत्राने जनावराच्या दावणींत बांधले तरी हा गृहस्थ त्या पत्राला शिष्टाचाराचे नियम शिकवायला तयार नसतो. परंतु न्यायाच्या बाबतीत 'रामशास्त्री' म्हणून माट्यांचा लौकिक फारसा नसल्याने, त्यांचे वरील अक्षम्य दोषही कार्याच्या महत्त्वाकडे लक्ष देऊन क्षम्य मानणे अपरिहार्य आहे. माट्यांनी हे कार्य हातांत घेतले तर त्याचा व्याप सदाशिव पेठेबाहेर ते खचित वाढवितील अशी मला खात्री आहे. कृष्णरावांनीही वाटेल त्या विषयावर पले टीका करण्याचे तंत्र बदलणे अवश्य आहे. दिवसभर 'तासणारा' कारागीरसुद्धा मंगल प्रसंगी सनई चौघटा वाजवितो हे कृष्णरावांनी विसरू नये. अत्रे-फडके यांजबद्दल योग्य त्या वेळी चांगले उद्गार कृष्णरावांनी जाहीर रीतीने काढले तर त्यांच्या निःपक्षपाती स्वभावाबद्दल तरुण पिढीची खात्री होईल. सध्याचे अनिष्ट वाङ्मय अत्रे-फडक्यांना मनापासून आवडते असे आग्रहाने गृहित धरणेही त्या थोर आणि ख्यातनाम लेखकांना अन्यायाचे होईल.

कृष्णरावांचे काहीही चुकत असले तरी त्यांच्या कार्याकडे व शुद्ध हेतुकडे तरुण पिढीने चिकित्सक बुद्धीने पहावे. कानफाट्या म्हणून जरी त्यांचा आज लौकिक असला तरी तरुण पिढीच्या कल्याणासाठीच संस्कृति-संरक्षकाची भूमिका त्यांनी पत्करली आहे, हे लोकांनी विसरू नये. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही, की त्यांची खरी योग्यता आम्हांस पटलेली नाही. अनिष्ट वाङ्मयाची नशा उतरल्यावर, तिच्या भयंकर प्रतिक्रियेतून त्यांना तरुण पिढी बचावायची आहे आणि म्हणूनच पुरोगामी लेखकांइतकेच तेही तरुण पिढीचे मित्र आहेत असे मला वाटते, त्यांची ओळख करून घ्या आणि त्यांचे काही चुकत असेल तर तसे त्यांना सांगा. ते तुमच्यावर रागावणार नाहीत. त्यांच्यामागे महाराष्ट्रातील तरुण पिढी अंशतः तरी आहे असे त्यांना पटले तर त्यांना फार समाधान होईल. भाऊ कॉलेजच्या कोपऱ्यावर ते तुम्हाला कधी तरी सकाळचे भेटतील. त्यांच्याबरोबर गाय असली तरी बिचकून जाऊ नका. त्यांच्या घरी जाऊन बिन आरामाच्या खुर्चीवर बसा आणि त्यांच्याशी मोकळेपणाने गप्पा मारा. तुमच्या नशिबांत असले तर तुम्हाला लाडू आणि सरबत मिळेल आणि त्यादृष्टीने तरी तुमचा वेळ फुकट गेला नाही असे तुम्हाला वाटेल.

Bahuvidh.com वरुन साभार

*(बहुविध डिजिटल मिडियाच्या पुनश्च या उपक्रमांतर्गत गेल्या १५० वर्षांतील मराठी नियतकालिकांमधील दर्जेदार लेख डिजिटल स्वरूपात प्रसिद्ध केले जातात.)*

## अरे कोरोना!

क्यौं रोना, क्यौं रोना
किती जरी केला धिंगाणा
म्लेंच्छ, आंग्ल, पाणी पाजले ना, शकहूणा।
बाजी थोरले पेशवे, शिवप्रभु, फडणीस नाना
आले शिरावरी जरी घनघोर घाले,
दारिद्र्य, दुःख अपमान झाले
शेंडी कोरोना रिपूची उपटू, सावरकर तात्या, नरेंद्र मोदी,
केशव, माधव, पवार शरद म्हणाले ना
कंटाळा, आळस, शब्द मुळी नको, निराशा नको
व्हा, होकारार्थी, तलवार म्यानांतली उपसाना
कोरोनापुढे, नका मुळीच कर
अति दूर नको कोरोनाने जाण्या नष्ट त्याला करूया ना
आणले चिन्याने, हे संकट, करतील भारतीय नष्ट
भारतीय पडले भारी चिनी नी लाल माकडांना
२१ वे शतक हे अपुले, अजिंक्य भारत ठरणार ना.

**अच्युत म. चक्रदेव,**
पुणे (भ्रमणध्वनी : ९६२३५५०६३३)

**एकदोन वेळा समजावून सांगूनही पटत नसेल, कुणी ऐकत नसेल तर, तर समोरच्याला समजावणं सोडून द्यावं.**

**ऐकूनही न ऐकल्यासारखं करत असतील, तर उगाचंच संवाद साधणं सोडून द्यावं.**

# सहल - अंबाजोगाई दर्शनाची

• सुधाकर (बाळ) मराठे (पृ.२५२), पुणे भ्रमणध्वनी : ९८२२३२९७७०



आमच्या चित्तपावन संघ, बिबवेवाडी तर्फे, आयोजलेल्या 'अंबाजोगाई' सहलीचा आनंदायी अनुभव आम्ही उभयतांनी नुकताच घेतला.

सर्वच चित्पावनांची 'कुल स्वामिनी' म्हणून जी ओळखली जाते. ती 'श्री योगेश्वरी माता' म्हणजेच बीड जिल्ह्यातील 'श्री अंबाजोगाई' उर्फ 'जोगाई माता!'

दुष्ट दानवांचा नाश किंवा वध करण्यासाठी जेथे मातेने 'अवतार' घेतला तेच ठिकाण म्हणजेच पवित्र तिर्थस्थान असे 'अबाजोगाई' होय. येथेच अंबा कुमारीकेच्या रूपात स्थिरावली असे म्हणतात.

जवळच असलेल्या बारा ज्योर्तिलींगापैकी एक म्हणजे 'परळी वैजनाथ' येथील शंभो वैजनाथाचे दर्शन घेण्याचा योगही आला.

पहाटे ५.३० वाजताच सर्वच जण वेळेवर हजर होते. बरेचसे वरीष्ठ, थंडी असूनही उत्साहात, शिस्तीत हजर होते. प्रथेप्रमाणे गाडीला हार-नारळ, हळद-कुंकू अर्पण करून श्री गणेशांचा व योदेश्वरीचा जयजयकार करीतच गाडी मार्गस्थ झाली.

दुपारी जेवणाच्या वेळी सहज मुक्कामी पोहचू असा अंदाज होता, पण जागोजागी चालू असलेली रस्त्यांची कामे त्यामुळे अरुंद व खराब रस्त्याने जाण्यामुळे जेवणाची वेळ ही टळून गेली होती. पण सकाळी वाटेतच घेतलेली न्याहारी, जेष्ठांचीही उत्साहाने भरलेली मने, गप्पा-गोष्टी व गाण्याच्या भेंड्या या सर्वांमुळे वेळ तर मस्तच गेला, पण भूकेची जाणीव ही झाली नाही.

आपलेच चित्तपावन बांधव म्हणजे 'गाडगीळ' सराफ व 'चितळे' बंधू मिठाईवाले यांच्या सौजन्याने बांधलेल्या सुंदर अशा निवासी स्थानी पोहचताच, प्रवासाचा शीण पळून गेला. त्यातच सुग्रास व गरमागरम भोजन तयार होतेच, भोजनानंतर अल्पशी विश्रांती घेऊन पुन्हा सर्वजण परळी भेटीसाठी तयारही झाले.

३/४ मजली स्वच्छ निवासस्थान जवळच असलेले योगेश्वरीचे मंदीर, शिवाय चविष्ट व आपुलकीने भरलेले सुग्रास जेवण या मुळेच सर्वचजण खुशीतच होते.

संध्याकाळच्या वेळेसच 'परळी' देवळात पोहोचलो. रविवार असल्यानेच फारशी गर्दी ही नव्हती. वैजनाथांचे दर्शन ही शांतपणे व प्रसन्नतेने झाले, देवळातच आमच्यातील 'स्त्री' वर्गाने रूद्रपठण ही महिम्न स्त्रोताबरोबरच श्रद्धापूर्वक केले. पुन्हा निवासस्थानी येईपर्यंत भक्तीपूर्ण भावनेने सर्वच जण भारावून गेले होते.

निवासस्थानी सौ. जोशी व सहकाऱ्यांनी गरमागरम जेवण तयारच ठेवले होते, साधे कढी व मुगाच्या खिचडीचे जेवण, पण सौ. जोशी व सौ. सोमण काकूंच्या हातातील चवीला मिष्ठान्नाची गोडी होती हे नक्की. त्यामुळेच सारेच जण आनंदाने लगेचच निद्रादेवीच्या आधीन झाले.

दुसऱ्या दिवशी आपापल्या सोयीने दर्शन घ्यावे व ९ वाजेपर्यंत न्याहारीसाठी येण्याची सूचना होती. आपले बांधव भल्या पहाटेच शुचिर्भूत होऊन जोगाईच्या देवळात हजर होते. अनेकांनी तेथील गुरुजींच्या मदतीने 'अभिषेक' पूजा-प्रार्थना केल्या. प्रसन्न व आनंदी मनाने देवीला साडी-चोळीची ओटी ही अर्पण केली. नैवेद्य-दानधर्म स्त्रोत्र पठण इ. कुळाचार संपन्न करून, देवळाभोवती प्रदक्षिणा घालून 'तांबुल प्रसाद' ही घेऊन सर्वचजण अगदी वेळेवर, न्याहारी व चहासाठी निवास स्थानी हजर झाले. न्याहारी व चहाचा आस्वाद घोऊन १०.३० वाजता जवळची स्थळे, दर्शने पाहण्यासाठी पुन्हा सर्वचजण निघाले.

मूळ जोगाईचे मंदीर कवी मुकुंदराज समाधी दर्शन, खोदकामातील प्राचीन दगडी मंदीर व शिल्प, वनराई क्षेत्र इत्यादि ठिकाणे पाहता आली.

जोगाईचे मूळ मंदिर गावापासून थोडे लांब पण निसर्ग रम्य ठिकाणी आहे. म्हणूनच मुख्य देऊळ वस्तीजवळ बांधण्यात आल्याची आख्यायिका ही ऐकण्यात आली.

कवी मुकुंदराज यांचे समाधी स्थळ ही सुमारे ११० पायऱ्या खोलवर होते, पुन्हा तेवढ्याच पायऱ्या चढून येताना थोडी दमछाक झाली. पण आजूबाजूचा सुंदर निसर्ग एकमेकांना केलेली मदत गोळ्या, थंडपाणी, बिस्कीटे इत्यादींच्या मदतीने दमछाक सहजच दूर झाली.

जवळच असलेले जीर्ण व उद्ध्वस्त झालेले, दगडी मंदिर दर्शनही झाले. बहुधा खोलेश्वर असे नाव असावे. शंकराची पींडी खूप खोलवर होती. प्राचीन संस्कृती व वास्तूकलेच्या असंख्य तुटलेल्या मूर्तीही पाहायला मिळाल्या, अनेकांना तेथे 'फोटो सेशन' करण्याचा 'मोह'ही आवरता आला नाही. हिरवेगार वनराई क्षेत्र ही लांबूनच पाहता आले.

साधारण १.३० वाजता सर्वजण मुक्कामी परतले, गोड पुरणाच्या वासानेच सर्वांच्या भूका चाळवल्या, मऊसूत गरमागरम पुरणपोळी, कटाची आमटी व इतर साजेश्या पदार्थांनी साग्रसंगीत भोजन झाले. जोडीला 'सवाष्ण' व कुमारीका ही असल्याने भोजनाची गोडी अधिकच वाढली.

नैवेद्य म्हणून अनेकांनी पुरणपोळ्यांची खरेदीही केली. सौ. जोशी व सौ. सोमण यांनी न्याहारी ते भोजन यांची केलेली उत्तम सोय केवळ अविस्मरणीयच.

शेवटी चला चला म्हणत दुपारी ३.३० वाजता आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. दुपारची वेळ, पुरण पोळीने आलेली सुस्ती आणि पुन्हा कंटाळवाणा प्रवासामुळे बहुतेकांचे डोळे पेगाळू लागले होते. २/४ तास असेच गेल्याने सर्वांनाच चहाची आठवण झाल्याने 'चाऊमाऊ' सह चहापानही झाले.

पुण्यास पोहोचण्यास उशीर होणार होताच, वयस्कर मंडळी, औषधे गोळ्या घेणे क्रमप्राप्त असल्याने पुन्हा रात्रीच्या जेवणासाठी तासभर गेलाच नंतर मात्र केव्हा एकदा आपआपल्या मुक्कामी जातो असे सर्वांनाच जाणवू लागले.

जाता-येतानाचा खराब रस्त्यावरील कंटाळी प्रवास पण संयमी व न चिडता गाडी चालविणाऱ्या काकांमुळे तो ही सुसह्य झाला, रात्री १२च्या सुमारास सर्वजण सुखरूप मुक्कामी पोहोचलो.

'आई योगेश्वरीचे' आशिर्वाद आमच्यातीलच 'प्रसाद जोशी' दांपत्यांचे उत्तम व संयमी नियोजन व ज्येष्ठ असूनही आनंदाने व उत्साहाने सामील झालेले सर्व सहकारी या मुळेच आमची 'अंबाजोगाई' सहल अविस्मरणीय झाली हे नक्की. ♦

---

# कारागृहातील अनुभवकथन

◆ अ.म. चक्रदेव, पुणे भ्रमणध्वनी : ९६२३५५०६३३

**ही** साधारण १९७३-७४ची कथा. त्यावेळी मी येरवडा म. कारागृहात पृथक् विभाग तुरुंगाधिकारी व सांस्कृतिक विभाग तुरुंगाधिकारी म्हणून काम करीत होतो. अचानच माझ्या समोर एक तरुण बंदी, संपूर्ण भगवे कपडे घातलेला, पायपोठ भगवी कफनी, गळ्यांत निरनिराळ्या माळा घातलेल्या, कपाळावर आडवे भस्माचे पट्टे, अशा थाटाची ती व्यक्ती होती. मी तिच नाव विचारताच त्याने वरीलप्रमाणे नाव सांगितले. अत्यंत विनम्र आदबशीर बोलणे हा त्याचा स्वभाव विशेष होता. मी त्याला विचारले तेव्हा त्याने ४२० भा.दं.संहिता असे सांगितले. पण का कुणास ठाऊक? मला त्याच्या डोळ्यात प्रामाणिकपणाची झलक दिसली. मी त्याला विचारले, तर त्याने सांगितले की, खरेच त्याने सांगितले की, हिंदीमध्ये सांगितले की, त्याने तरुणपणात संन्यास घेतला आहे. आणि आता तो भारतभर धर्मकार्यात एका कारने हिंडत आहे. धर्मकार्यार्थ असल्याने त्याने कारला तीनही बाजूंनी भगवी आच्छादने, भगव्या पताका लावल्या होत्या. त्याचे एकूण कार्यावर विश्वास ठेवून एका महिलेने त्याला स्वतःची कार वापरायला दिली होती. नेमका त्याचा गैरफायदा एका चतुर तस्कराने घेतला. स्वामींचे नकळत तो त्यांचे कारमध्ये अफू, भोग, तरस, गांजा या बेकायदेशीर वस्तू ठेवत असे. कार संपूर्ण मुंबईभर फिरत असल्याने व सगळा भगवा कारभार असल्याने सर्वांचे विश्वासास ती कार पात्र झाली होती. कारमधले आवाहन ऐकून धार्मिक काम म्हणून प्रत्यही अनेक लोक स्वामींना नमस्कार करून करून स्वेच्छेने काही ?? दान म्हणून देत. लखनौला एका आश्रमात भक्तांचे भोजनसेवेसाठी या द्रव्याचा स्वामी उपयोग करीत असत. अचानक हा सर्व प्रकार चालू असता कोणत्याही टोल नाक्यावर ही कार अडवली गेली नाही. सर्व तपासणी अंती आत तस्कराने लपवलेले गांजा, चरस, अफू हे पदार्थ धरले गेले. स्वामींना हातकड्या घालून पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात आले. व तूर्त चौकशीसाठी म्हणून न्यायालयीन कैदी म्हणून येरवडा कारागृहात पाठवले गेले.

मी कारागृहात तो येताच याबाबत विचारणा करीत असे. ४-६ महिने असेच गेल्यावर बाहेरही आत्मानंद स्वामींना ५-७ वेळा न्यायालयात बोलावले हेले. तरुण वय, भगवे कपडे स्वामींची परखड भाषा यावर बरीच चर्चा वकीलांमध्ये होत असे. स्वामींचे तस्कर म्हणून सिद्ध करण्यामध्ये सरकारी वकील पूर्ण अपयशी ठरले आणि आत्मानंद स्वामींना निर्दोष म्हणून मुक्त करण्यात आले.

खरे तस्कर, महंमद हाफीज, अब्राहम महंमद यांना दोषी ठरवून दंड व सक्तमजूरी अशा शिक्षा ते भोगत आहेत. धर्मप्रसार करताना वेगळच काही घडतं. सर्वांमध्ये आपण मिसळतो. ही संन्यास धर्माशी आपण प्रतारणा केली ही आपलीच चूक आहे. अशी समजूत करून घेवून त्यांनी तो मार्ग सोडला व ते हिमालयात पुजारी तपश्चर्येसाठी निघून गेले.

आत्मानंद स्वामींची गुन्हेगारीची झालर लागलेली ही कथा संपली. आता स्वामी कोणाला, कोठे भेटणार कोणास ठाऊक?

परंतु स्वामीजींना पुन्हा समाजातच येवून पू. गोळवळकर गुरुजी, स्वा. सावरकर यांच्याप्रमाणे जनताजनार्दनास मार्गदर्शन करावे ही मनोमन इच्छा आहे. ♦

## सौ. संजना आनंद मराठे, कुर्धे. रत्नागिरी यांची स्वच्छता अभियानासाठी स्फुर्तीगीते.
## मोबाईल ९०९६७५७१६१

**चाल : नेहेमीच राया तुमची घाई...**

नेहेमीच मंडळी तुमची घाई
नका लागू आवराआवर करायलाऽऽऽऽऽऽ
थोडा तरी वेळ द्या स्वदेहाला हो
थोडा तरी वेळ द्या देशकार्याला ।।धृ।।

अहो मुघल गेले ब्रिटिश गेले। २
स्वातंत्र्य तरिही नाही मिळाले
मानसिक गुलामी तोडायला हो
थोडा तरी... ।।१।।

नऊवारी गेली पाचवारी चालली २
लेगिन जीन्सची संस्कृती आली
कुंकवाचा धर्म तुम्ही टिकवायला हवा हो
थोडा तरी... ।।२।।

साड्या दागिने वरशोभेचे २
व्यायाम, प्राणायाम नित्य गरजेचे
सिरीयल शॉपिंग हो नेहेमीचे -२
लगोरीचा आनंद लुटायला हवा हो
थोडा तरी... ।।३।।

**चाल : नाच गं घुमा, कशी मी नाचू?- २**
या गावात त्या गावात
खड्डे रस्त्यात की रस्ते खड्ड्यात
कशी मी नाचू?
नाच गं..... ।।१।।

या गावचा, त्या गावचा
ओढा नाही स्वच्छ, सांडपाण्याने त्रस्त
कशी मी नाचू?
नाच गं..... ।।२।।

या गावात, त्या गावात
झाडे नाही जास्त, प्रदुषणाचे प्रस्थ
कशी मी नाचू?
नाच गं घुमा। ।।३।।

**चाल : किलबिल किलबिल पक्षी बोलती**

गुणगुण डास गुणगुणती, भुळभुळ गटारे वाहती
जागोजागी कचरा फेकती, भिरभिर भिरभिर माशा भिरभिरती
असा नको गं बाई, असा नको गं बाई आमुचा देश असा नको बाई
टणटण घंटा वाजते, कचरागाडी नियमित फिरते
स्वच्छप्रिय नागरिक इथले, साफसफाई येथ नांदते, असाच हवा बाई-२ आपुला देश असा हवा बाई.
स्वप्न पाहीले आम्ही एक बाई असाच हवा बाई आपुला देश असा हवा बाई. ।।धृ।।

या देशाची जनता न्यारी, स्वच्छतेची पाईक भारी
कुणी न येथे कचरा फेकती, कुणी न येथे थुंकून जाती
बघाल तेथे स्वच्छच सारे, दुर्गंधी कोठे नाही
स्वप्न पाहीले आम्ही एक बाई आपुला देश असा हवा बाई।।१।।

या देशातील जागरूक नारी
ओल्या सुक्याचे वर्गीकरण करी.
रिसायलिंग, कंपोस्टिंग आर्थिक स्थैर्या नेई
स्वप्न पाहीले आम्ही एक बाई आपुला देश असा हवा बाई.।।२।।

**मुलं मोठी झाल्यावर स्वतंत्रपणे निर्णय घेत असतील, तर त्यांच्या पाठीमागे लागणं सोडून द्यावं.**

**एका ठराविक वयानंतर कोणी नावं ठेवली, तर मनावर घेणं सोडून द्यावं.**

**आपल्या हातात काही नाही; हा अनुभव आल्यावर, इतरांची वा भविष्याची चिंता करणं सोडून द्यावं.**

**इच्छा आणि क्षमता यात फार अंतर पडू लागलं, तर स्वतःकडून अपेक्षा करणं सोडून द्यावं.**

# आजी!

• रघुवीर मराठे (पृ.४२२), वडोदरा भ्रमणध्वनी : ९८७९१८१८३३

आजी आणि नातीचे संबंध काही वेगळेच असतात! दोघीही एकटेपणा दूर ठेवण्याकरता बरोबर जीवन जगण्याचा आनंद घेत असतात. ''आई, आज राधिका येणार नाहीये तर तुम्ही तिच्याजवळ थांबाल का? आजचा दिवस शक्यतोवर मी लवकर येण्याचा प्रयत्न करेन.'' अमिताने ऑफिसला जाण्याच्या तयारीत असताना सांगितले. ''हो, काही हरकत नाही. काळजी करू नको शांत चित्ताने ऑफिसला जा मी सांभाळीन! प्राची कुठे आहे?'' आजीने विचारले. ''आता प्राची दूध पिऊन झोपली आहे. आज सकाळी लवकर जागी झाली होती. म्हणून आता एक ते दीड तास झोपून राहील. जागी झाली की सांभाळा.'' अमिता ऑफिसला गेल्यावर मी तिला कसं सांभाळावं त्याची मनोमन तयारी करत होते. तसं तर मी प्राचीकडे लक्ष देतच असते दिवसभर! तिला आंघोळ घालणं, तयार करणं, खायला, प्यायला घाल हे सर्व राधिका बघते. सोनाली गेल्यावर ती बरोबर दीड तासाने उठली. तेव्हा तिला आंघोळ व कपडे घालून होईस्तोवर माझ्या डोळ्यासमोर अंधारीच आली. मी म्हटलं निसर्ग सुद्धा किती विचार करून नियम नक्की करीत असतो. शरीरात जोपर्यंत ताकद असते तोपर्यंत प्रत्येक स्त्री सर्जनशील असते पण तेच शरीर वृद्धावस्थेत सगळी क्षमता परत खेचून टाकत.

खरी मजा तर आताच येणार आहे. आख्खा दिवस राधिका तिच्या मागे मागे असायची माझं शरीर तिच्याप्रमाणे लवचिक नाही किंबहुना एवढे श्रम मला झेपणारच नाही. येत्या आठवड्यापासून प्राचीची सुट्टी संपणार शाळा चालू होणार होत्या. मी मनाशी ठरवलं ''चला आजपासून तिच्याबरोबर शाळा शाळा खेळायची म्हणजे मला तिच्या मागे मागे जावं लागणार नाही आणि प्राची मानसिकरीत्या शाळेत जायला तयार होईल. रजेनंतर मोठ्यानासुद्धा कामावर जायला कंटाळा येतो. त्यामुळेच 'मंडे सिंड्रोम' प्रचलित झाला आहे आणि ही तर बिचारी लहान आहे. एवढ्या मोठ्या सुट्टीनंतर शाळेत जायचं म्हणजे किती कंटाळा येणार! आणि त्यात शाळेच्या शिस्तीत छुटछाट कुठेच चालत नाही जी घरात मिळते.

शाळेच्या नावाने रडणारी प्राची शाळा शाळा खेळायला एकदम तयार झाली. असही असू शकत की बरेच दिवस घरी राहिल्यामुळे तिला कंटाळा आला असेल. आणि काहीतरी नवीन करायचं असेल तर मुलांना सुद्धा थोडासा चेंज (बदल) हवाच असतो. मग मी तिच्याकडून ब्रश करून घेतला कपडे बदलले नास्ता केला आणि शाळेत सोडायला आणि आणायच नाटक केलं. हेच नाटक काही वेळा ती पण माझ्याबरोबर करायची. असं खेळण्यात आमचा संपूर्ण दिवस निघून गेला.

आता तर ती रोज रोज कधी कधी 'घर-घर' कधी डॉक्टर-डॉक्टर खेळायची तिला चांगली सवय लागावी म्हणून दोन वेळा हात धुवायला सांगायची अथवा जेवणानंतर तोंड तीचं मीच पुसायची. ती पण माझ्याबरोबर तसेच करायची. आमच्या दोघात चांगलं अंडरस्टॅण्डिंग झालं होत.

एवढ्यानेच गोष्ट पुरी होत नाही आता तर प्राचीची शाळा सुरू झाली होती. तिने नियमित शाळेत जाणं सुरू केलं. एके दिवशी शाळेतून घरी परतल्यावर ''आजी, हात उंच कर'' आणि माझे दोन्ही हात पकडून ती गायला लागली. ''भटो भटो, चोराने काय केलं?'' ''चोराने शंभर रुपयांचं घड्याळ चोरलं, तुरुंगांत जावं लागणार, तुरुंगांत जावं लागणार.'' तिचा नवा खेळ बघून माझं मन भूतकाळात गेलं. शाळेत चालू तासात गुपचप नास्ता करून घ्यायचा आणि रिसेसची घंटा वाजली कि कंपौंडमध्ये खेळायला जायचं, खेळता खेळता कधीकधी मास्तरांवर आदळायचो. अशा वेळेस धपाटा पण खायला लागायचा. त्यावेळेस कसलीही चिंता वाटायची नाही, शाळा सुटल्याबरोबर संध्याकाळची वाट बघायची. दुपारी झोप येत नसल्यामुळे आणि होमवर्क हा काही प्रकार कमी असल्यामुळे बरं असायचं. सांजवेळ होतांच सोसायटीमध्ये क्रिकेट, ऐसपैस, लगोरी, विटीदांडू अशा बिन पैशाच्या खेळांत वेळ निघून जायचा. गरीब, श्रीमंत आणि वाहतूक असा काही प्रकार नव्हता. आमची सोसायटी आणि सोसायटी कंपौंड एक प्रकारचे मैदान होऊन जायचे.

एकदम किस्सा आठवला एकदा सोसायटीच्या नाक्यावर दोन तीन, मुलं स्कुल बॅग घेऊन आली होती. बॅग बऱ्याचं जड असाव्यात. सकाळची वेळ बघून मला त्यांची करुणा आली बघता बघता पाच सात मुलं आणखी आली मग काय? बघायलाच नको. मुख्य रस्ताच मुळी खेळाचे मैदान झालं.

आणि सुरू झाला सात टाळ्यांचा डाव. समोरच्या बाजूने दुसरी दोन मुलं येताना दिसली रस्त्यावर पडलेला डब्बा त्यांच्यासाठी फुटबॉल झाला. थोड्यावेळाने बस आली ''सगळ्यांनी स्वतः च्या बॅगा उचलल्या आणि बसच्या दिशेने दौडायला सुरुवात केली. कोण पुढे जाऊन लवकर बसतंय त्यासाठी स्पर्धा सुरू झाली. त्यातल्या त्यात जो अत्यंत मस्तीखोर मुलगा होता तो सगळ्यांत आधी बसमध्ये चढला पण त्याची बॅग मिळत नव्हती. तेवढ्यात एका मुलाने हाक मारली... 'सौरभ, तुझी बॅग तर घेऊन जा.'' तो अगदी निश्चल मनाने खाली उतरला आणि शांतपणे बसमध्ये जाऊन बसला ह्या वेळेस तो सर्वांत शेवटी होता. सर्व मुलं मस्ती आणि मजा करत होती. मी विचार करायला लागले कि आज आणि आताच्या परिस्थीत कस रहायचं ते ह्यांच्याकडून शिकावं.

तेवढ्यात प्राची म्हणाली. ''आजी! आज मी तुला शिकवीन'' मी काही बोलणार तेवढ्यात तिने शिकवायला सुरुवात केली, ''ए फॉर ॲपल, बी फॉर बॉय.'' ऐकू येत नाही मोठ्याने बोला, जरा आणखीन मोठ्याने, परत बोला. खरोखर मुलं माकडांसारखीच असतात. नक्कल करण्यात एकदम हुशार. थोड्या वेळाने तिने सांगितले. ''आजी उभी रहा, लायनीत चाला, पुढे या, मागे जा.'' माझ्या शरीरात एवढी शक्ती कुठे होती. की ती जे सांगेल ते मी करू मग तिने माझ्यापाशी किट्टा केला, रुसली परत माझं मन भूतकाळात गेलं. ''माझीपण किट्टा जा.''

ती आश्चर्याने माझ्याकडे बघतच राहिली आणि मला विचारलं. ''आजी तुला, किट्टाबिट्टा येत?'' चल आपण तस खेळू या आणि मी तिचा आदर्श झाले.''

एके दिवशी ती आजोबांची करंगळी पकडून फिरत असताना परत मी भूतकाळात गेले. माझे बाबा रोज जेवण झाल्यावर गच्चीवर फेऱ्या मारायला जात असत. मी सुद्धा बऱ्याचवेळा त्यांच्याबरोबर जात असे. त्यावेळेस ते मला गच्चीत फेऱ्या मारताना घड्याळ शिकवीत असत इतकं की आकाशातील ध्रुव आणि सप्तर्षी पण बघायला शिकवले अगदी सहज आणि आज सुद्धा मला त्याची आठवण येते. हल्लीच्या धावपळीच्या जीवनात वडिलांना वेळ नसतो नाही मुलांना वेळ मिळत आणि आजकालच्या मुलांना ते शिकायची पण इच्छासुद्धा नसते ते स्वतःच काही नवीन करायला बघत असतात. स्वतःच मूल्यांकन स्वतःच करतात. दुसऱ्या बाजूला आताच्या पिढीला असं काही नवीन शिकायची इच्छाच नाही आणि वेळही नाही त्यांना स्वतःसाठीसुद्धा वेळ नसतो. तो तर स्वतःच्या धुंदीत सर्व बाबतीत अनभिज्ञ होऊन पुढे जात असतो. कदाचित त्यामुळेच डे बोर्डिंग, क्रेनच, पाळणाघर वृद्धाश्रमांची संख्या वाढत जात आहे. जसा डिमांड तसा पुरवठा अर्थशास्त्राचा नियम आहे मागची पिढी आणि आताची पिढी बिचारी लाचार आहे. जर ह्या दोन्ही पिढ्यांमध्ये सुमेळ झाला तर किती सुंदर दिवस येतील.

मी सुद्धा विचार करताकरता कुठल्याकुठे निघून गेले. डोक्यातून विचार जाताच नाहीत. एकदा वाटलं एक दिवस प्राचीला शाळेत सोडायला जावं. नेहमीप्रमाणे तिने वॉटरबॅग, शाळेची बॅग हातात ठेवून दिल्या. आणि तेवढ्यात ओरडली ''आजी, पाण्याची बाटली आणि स्कूल बॅग तुम्ही धरा. मी तुम्हाला शाळेत पोहोचवायला येते.'' आणि खरोखरच स्कुलबॅग, वॉटरबॅग माझ्या हातात ठेवून दिली. शाळेत जाताना तिला रडवण्यात काहीच अर्थ नव्हता. मी मुकाट्याने सगळं घेतलं आणि तिचा हात पकडून शाळेचा रस्ता चालायला लागले.

शाळेत पोहोचल्यावर मी काही तिला सांगणार तेवढ्यात माझा हात शेवटपर्यंत घट्ट पकडून थेट वर्गापर्यंत घेऊन गेली मग क्लासच्या खिडकीपाशी येऊन सांगते मला सांगते कशी...''आजी बाय बाय'' आणि ती मागे न बघता शाळेच्या दरवाज्यापर्यंत पोहचून गेली सुद्धा. माझी परिस्थिती बघून वर्गातील मुलं आणि शिक्षक खडखडाट हसायला लागले. स्थिती समजल्यामुळे मी माझं हसू चेहऱ्यावर थांबवू शकले नाही. आता मी तिची आजी नव्हते तर ती माझी आजी झाली होती.'' खेळ हेच जीवन आहे आणि जीवन हा एक खेळ आहे. हा सोपा मार्ग तिने मला सहज दाखवला. ♦

## सहवेदना



बदलापूर येथील श्रीपाद मेघश्याम मराठे यांच्या मातोश्री सौ. सुहासिनी मेघश्याम मराठे यांचे चिपळूण येथे दि.३०/११/२०२० रोजी पहाटे २.३० वाजता हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. ईश्वर आत्म्यास शांती देवो हीच प्रार्थना

## ।। सोडून द्यावं ।।

**प्रामुख्याने, वरिष्ठ नागरिकांनी बाकी जगणे राहिलेल्या आयुष्याचा व घरातील सदस्यांच्या मानसिकतेचा तसेच वर्तमानातील रोजच्या अनुभवांचा एकत्रितपणे विचार करून, कुणावरील राग, लोभ, मत्सर, हेवा, स्वभावातील हट्टीपणा, यांचा मनात साठा करून ठेवणं सोडून द्यावं.**

आम्ही म्हातारे

# वाढदिवस वय १०-११ - ८४ वर्षाचा

• श्री. सदाशिव बळवंत मराठे (पृ.३८५), बडोदरा दूरध्वनी : ०२६५-२४२३०५५

**मी** तेव्हा १०-११ वर्षाचा असेन, काकूने (आईने) सांगितले ''आज तुझा वाढदिवस आहे, सर्वांना नमस्कार करून मग शाळेत जा.'' मी म्हटले ''माझा वाढदिवस आहे तर गोड काय करशील!'' तीने एका डब्यातून दोन आण्याचे नाणे माझ्या हातावर ठेवले व म्हणाली ''तुझ्यापुरते नवटाक (५० ग्राम) श्रीखंड घेवून ये आणि एकटाच ते खावून तोंड गोड कर. मी तसेच केले. आईने माझा मुका घेतला. त्यातच मला खूप आनंद वाटला.



त्यानंतर आजतागायत वाढदिवसाचा तेवढा आनंद वाटल्याचे अजिबात स्मरत नाही. मात्र माझी दिवंगत पत्नी, सुधा बरोबरचा प्रत्येक दिवस हा वाढदिवसाच्या आनंदाप्रमाणेच अनुभवला. सर्व साधारण जोडण्यास येतात. तसेच अनेक कटू/मधूर अनुभव घेत ४ अपत्यांचा संसार सांभाळ पत्निच्या सहवासात सारी वर्षे एक चांगले कुटुंब अस्तित्वात आले व आजही त्याची प्रचिती अनुभवास येते. कै. सुधाचे निधन झाल्यापासून (जानेवारी २०११) घरातील वातावरणात बराच फरक पडला होता. त्या दिवसापासून गेले तीन वर्षे कुणाचाही वाढदिवस साजरा केला नव्हता. घरातील एका माणसाची अनुपस्थिती खूप जाणवत होती. परंतु आज अचानक मुलांनी, सुनांनी, नातवंडांनी घरातील उदासिनता कायमची घालविण्याचा चंग बांधला होता. नव्या जोमाने जीवन जगण्याचा जणू चंगच बांधला होता. आज २५-८-२०१४ मी ८४ व्या वर्षात प्रवेश करणार होतो. हे सारे नमूद करण्याते तसेच कारण होते.

सकाळी देवपूजेची तयारी करत असताना अचानक मोठा मुलगा हेमंत व दीपिका, राजेंद्र व दिप्ती हातात पुष्पगुच्छ घेवून मला ८४व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देवून पाया पडले. पण लगेच पुष्पगुच्छाकडे बघून मनात विचार उभवला इथे तर पुष्पगुच्छातील माझ्या डोळ्यात अश्रू आणले. अर्थात ते प्रेमाचे, जिव्हाळ्याचे, भावूकतेचे होते म्हणून ते आनंदाचे हर्षाचे होते. आदराचे गौरवाचे होते. देवापुढे स्तोत्र म्हणत होतो. पण पुष्पगुच्छात मुलांचे, सुनांचे, नातवंडांचे चेहरेच समोर येवू लागले. देवपूजा संपोस्तोवर अश्रू थांबले नाहीत. परंतु आराध्य देवी आई या गायत्रीचा जप झाल्यावर मन शांत झाले.

संध्याकाळी आशुतोष-अंजलीचे कुटुंब जेवणास (पार्टीला) आले होते. माझ्या वाढदिवसाचा आनंद साऱ्या कुटुंबियांना खुप होता. मी मात्र साऱ्यांच्या आनंदात समरस होण्याचा प्रयत्न करीत होतो. त्यांचे माझ्यावरचे प्रेम व जिव्हाळा आणि त्या मागची भावना पाहून मनातून हर्षच होत होता. मी भारावून गेलो होतो. आणि त्यामुळेच की ही गोष्ट मला पसंद नसतानाही केवळ त्यांच्या आनंदाकरता कबूल करीत होतो. उदा. केक कापणे, मेणबत्तीला फुंकरत विझवणे एकूण सर्वांनी वाढदिवसाचा आनंद लुटला व मलाही त्यात सामील केले. पण मी मात्र अंतरात्म्यास समजावून कै. सुधाची गैरहजेरी न जागविण्याचा खूप कष्टाने प्रयत्न करीत होतो. एकूण सर्व दिवस मुलांनी आनंदात पार पाडला. त्याचे कौतुकच वाटले.

संध्याकाळी जेवण आटोपल्यावर फोटो सेशनही झाले व त्यानंतर ८४व्या वाढदिवसाचे अभिनंदन कार्ड सर्वांनी प्रत्येकाचे वेगळे दिले. तरीही एक मोठे अभिनंदन कार्ड समुहात आपापले हृदयाची वाक्ये स्पष्ट केली. व त्यांनीच माझे द्रवलेले मनाने ताबा सोडला. सध्याच्या बाहेरच्या कौटुंबिक/साहजिक वातावरणात हा अनुभवायला नवा होता.

माझ्या करीता वापरलेल्या विचारांना मी योग्य आहे की नाही माहित नाही. खरं म्हणजे मी सर्व सामान्य जीवन जगलो. प्रत्येकाची भावना कदर करण्यासारखी पण तरी सर्वांनी समूहात सही केलेले वाक्य महत्त्वाचे वाटले -

''हे रश्मिबंधन नेहमी असेच घट्ट होतील-राहतील याची आम्ही तुम्हाला आज खात्री देत आहोत.''

वरील वाक्याने मनाचे समाधान झाले, अपेक्षित होते, मी माझे आयुष्य योग्य मार्गाने जगलो त्याची पोच - रसीद मिळाल्याने समाधान मिळाले.

अंथरूणावर पडल्यावर मी गायत्रीचे स्मरण करून, शांत चित्ताने कुशीवर झोपलो, डोळ्यातील अश्रू कुशीत घेवून! ♦

(...पान २ वरून)

## दिवाळीचा फराळ!

मिठाईच्या कारखान्यात डोकावून पाहावे. कणभर धूळ – वास्तूमध्ये तशीच बनविणाऱ्या कामगाराच्या मनामध्ये तुम्हाला दिसणार नाही.'' उत्कृष्ट दर्जा, कृत्रिम रंग विरहित शुद्ध तूप, केसर आणि उत्कृष्ट दर्जाचे 'ब्रँडेड' जिन्नस वापरून बनवलेली मिठाई व नमकीन यामुळे ग्राहकांची सतत रेलचेल असते. मुख्य म्हणजे, सरोजच्या मिठाईमध्ये कुठल्याही प्रकारचे कृत्रिम रंग, प्रिझर्वेटिव्ह, वर्क वापरला जात नाही. त्यामुळे मिठाईची अस्सल चव कळते. मावायुक्त मिठाईसाठी लागणारा मावा सुद्धा सरोजमध्येच बनतो त्यामुळे कुठल्याही प्रकारे त्यात भेसळ होत नाही. याचाच परिणाम म्हणजे उत्कृष्ट चव आणि दर्जेदार मिठाई.

सरोजमध्ये २५० हुन जास्त प्रकारची मिठाई बनवली जाते, दूध, तूप, साखर, काजू, किसमिस, बदाम आणि शुद्ध केशर वापरून मिठाई बनते. मावा मिठाई, काजू मिठाई याचे विविध प्रकार सरोजमध्ये तयार होतात. ड्रायफ्रुट मिठाई मध्ये ही अस्सल ड्रायफ्रुट असतात नुसतं इसेन्स नाही. दर्जा असला की त्या दर्जेला अनुरूप सर्व मेंटेनन्स आला, पदार्थ टिकावा म्हणून योग्य पॅकिंग आलं. फक्त मिठाई बनविण्याची किंमत आकारता येत नाही. त्यासोबत मिठाई खाण्यासाठी सुरक्षित, भेसळमुक्त आणि ताजी असली पाहिजे. त्याची चव जशी अभिप्रेत आहे तितक्याच उत्कृष्ट दर्जाची असली पाहिजे. मिठाईचे बॉक्स सुद्धा किरकोळ न देता मिठाई व्यवस्थित राहील, तात्काळ खराब होणार नाही, कुणाला भेट म्हणून देतांनाही त्याचे पॅकिंग सुबक आणि छान राहील ह्याची काळजी सरोजमध्ये घेतली जाते. अनेक बाबींवर सखोल विचार आणि अभ्यास करून विविध सणसमारंभांसाठी त्या त्या समारंभांच्या अनुसार गिफ्ट पॅकिंगही केले जाते. भेट देतांना ती नुसतीच आकर्षक असून उपयोग नाही तर ती कायम स्मरणात राहावी यासाठी त्या सणसमारंभांचे औचित्य समजून मिठाई, नमकीन आणि त्याचे पॅकिंग करणे हि सरोजची आणखी एक खासियत!

महाराष्ट्रीयन पारंपरिक मिठाई जसे पुरणपोळी, पेढ्यांमध्ये मावा पेढे, दूध पेढे, बर्फीमध्ये शुद्ध तुपातली बर्फी, दुधाची बर्फी, काजू बर्फी, काजू कत्रीतील विविध प्रकार तसेच शुद्ध तुपातले लाडू, डिंक लाडू, सोहन पापडी, पौष्टिक लाडू, बंगाली मिठाई इ. प्रकार आहेत. शिवाय नमकीन मध्ये विविध प्रकारचे फराळी पदार्थ, फराळ प्रकार, चिवड्याचे प्रकार आहेत. ताज्या पदार्थांमध्ये काजू व किसमिस युक्त सामोसे, मटार करंजी, कोथिंबीर वडी अशा अनेक पदार्थांची येथे रेलचेल आहे.

सरोजच्या जिलेब्यांना खास मागणी असते. ताज्या गरमागरम सोनेरी रंगाच्या जिलेब्या. आकाराने लहान पण तोंडात टाकताच खमंगपणासोबतच केशराचा दरवळ जाणवतो. श्रीखंड, आम्रखंड, गुलाब जाम, रसगुल्ला आणि अनेकानेक स्वादिष्ट व जिव्हा तृप्त करणाऱ्या पदार्थांमुळे सरोजचा ग्राहक वर्ग पिढ्यानपिढ्या सरोज मध्ये येतो. खरंतर आज फ्रँचाईझीचा जमाना! साहजिकच मुंबईभर ब्रांचेस काढणे किंवा फ्रँचायझी नेमणे मराठेंना सहज शक्य असावे पण ग्राहकांच्या हिता करिता व्यवसायावर स्वतःचे जातीने लक्ष असावे ह्या उद्देशाने त्यांनी चेंबूर स्टेशन जवळील एकाच इस्टॅब्लिशमेंट मधून व्यवसायाची वृद्धी करण्याचा निर्णय घेतला असावा. पण तरीही त्यांच्या उत्कृष्ट पदार्थाची चव मुंबईत किंवा महाराष्ट्रातील घराघरात पोहचावी म्हणून शाखा काढणे किंवा फ्रँचायझी नेमणे हि काळाची गरज आहे. असे मला मनापासून वाटते. आपल्याला माहिती आहेच कि मी एक खवय्या आहे त्याचप्रमाणे स्पष्ट वक्ताही, त्यामुळे मी कोणाचीही किंवा कुठल्याही खाद्यपदार्थाची उगाचच स्तुती करणार नाही, त्यामुळे सरोजमधील सर्वच मिठाया उत्कृष्ट ह्या दर्जात मोडत असल्यातरी येथील केशर जिलेबी आणि सोहन पापडी, गुलकंद पेढा, अंजीर पेढा, केशरी मलाई पेढा आणि तोटा एक नंबर हे मी निश्चितपणे सांगू शकतो. त्याचप्रमाणे काजू युक्त कुठलीही मिठाई तोंडात टाका, मिठाई तोंडात पटकन विरघळली म्हणून समजा. मी शिवाजीपार्कला राहत असल्याने चेंबूरला जाणे क्वचित होते, पण माझे अनेक हितचिंतक चेंबूर मध्ये असल्याने येथील अनेक पदार्थ मी अनेक वर्ष खात आलो आहे. त्यामुळे मी सरोज स्वीट्स ची नक्की तारीफ करू शकतो. चेंबूर स्टेशनच्या समोर असल्यामुळे सरोजमध्ये नेहमीच गिऱ्हाईकांची वर्दळ असते. त्याचप्रमाणे सणासुदीला मिठाई घेण्यासाठी लांबच्या लांब रांगा लागतात, पण श्री. व सौ. मराठेंचे स्टाफचे ह्या ग्राहकांकडे जातीने लक्ष असते. श्री. शेषनाथ मराठे आणि मनीषाताई आपला व्यवसाय सांभाळतानाच, सामाजिक बांधिलकी जपायला अजिबात विसरत नाहीत

अनेक संधी येत गेल्या. वृद्धाश्रम, महिलाश्रम, अनाथालये, विद्यालय, महाविद्यालय, हॉस्पिटल्स, शैक्षणिक उपक्रम इतकेच नव्हे तर नाटक, सीनेमामधील नवोदित मराठी कलाकारांना यथाशक्ती मदतीचा हात देण्यासंबंधी अनेक कार्य त्यांनी पार पडल्याच्या अनेक कथा सर्वश्रुत आहेत. हेही नसे थोडके म्हणून भारतीय लष्करासाठीच्या विशेष कार्यक्रमाचे प्रायोजकत्व, सैनिकांसाठी मिठाई व फराळ देण्याचे उपक्रम सरोजमार्फत राबवले जात असतात.


अशा ह्या मराठमोळ्या मिठाई उद्योग व्यवसायात असलेल्या सरोज स्वीट्सच्या मराठे दाम्पत्याला माझा मानाचा मुजरा!

*साभार : श्रीनिवास मराठे* ♦

# शुद्ध आध्यात्मिक प्रेम - ८ मे - रविंद्रनाथ टागोर जयंति

• श्री. सदाशिव बळवंत मराठे (पृ.३८५), बडोदरा दूरध्वनी : ०२६५-२४२३०५५

८ मे हा रविंद्रनाथ टागोर यांचा जन्मदिन. १८७९ ची ही कथा. रविंद्रनाथ टागोर तेव्हा १८ वर्षांचे होते आणि उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याची तयारी करत होते. त्यापूर्वी दोन महिन्यांपूर्वी ते मुंबईत एक युवतीच्या प्रेमात पडले परंतु ते युवतीजवळ लग्नाची मागणी करू शकले नाही. त्या युवतीचे एका इंग्रजी माणसाबरोबर लग्न झाले. लग्नानंतर काही काळ ती बडोद्यातच होती.



रविंद्रनाथ टागोर मुंबईतच एक समाजसुधारक आत्माराम पांडुरंग तुरखाडेकरांकडे रहात असत. तुरखाडेकरांचा परिवार इंग्रजीने रंगला होता. आत्मारामांची मुलगी अन्नपूर्णा लंडनहून उच्च शिक्षण घेऊन आली होती. अन्नपूर्णा रविंद्रनाथांहून तीन वर्षांने मोठी होती. रविंद्रनाथ टागोरांचे मोठे बंधू सत्येन्द्रनाथ टागोरांची अन्नपूर्णाकडून इंग्लंडच्या रीती-भाती व तेथले माहोल, वातावरणाचा परिचय करून घेऊन इंग्रजी भाषेचा अभ्यास - इंग्रजी बोलणे वगैरे आत्मसात व्हावे अशी इच्छा होती. कुटुंबात समरस झाल्यावर रविंद्रनाथ टागोरांनी अन्नपूर्णेचे नाव नलिनी असे दिले. ही गोष्ट रविंद्रनाथ टागोरांनी कवि म्हणून ओळखले जाऊ लागल्यावर त्यांच्या बर्याथच काव्यात वापरले होते. अन्नपूर्णा (नलिनी) आणि रविंद्रनाथ टागोर यांना एकमेकांचे आकर्षण असूनही ते एकत्र येऊ शकले नाहीत. नलिनीला रविंद्रनाथ टागोरांच्या दाढीची हरकत होती. नलिनीने रविंद्रनाथ टागोर यांना स्पष्ट सांगितले, तू दाढी वाढवून तुझ्या चेहर्या वरच्या रेषा लपवू नकोस. रविंद्रनाथ टागोर खूप लाजरे होते. त्यांनी नलिनीचे म्हणणे ऐकले नाही. ते इंग्लंडला शिक्षणासाठी गेले.

ह्या घटने नंतर ११ नोव्हेंबर १८८० अन्नपूर्णेचे हेरॉल्ड लिटिल डेले सोबत लग्न झाले आणि अन्नपूर्णा बडोद्यास आली, कारण हेरॉल्ड बडोद्यात होता. अन्नपूर्णेचे हेरॉल्ड सोबत लग्न कसे झाले तेही जाणण्या सारखे आहे. अन्नपूर्णेचे मोठे भाऊ मोरेश्वर लंडन यूनिवर्सिटीत शिकले होते व बडोद्याच्या राजकुमाराचे प्रिन्स कॉलेजचे वाईस प्रिन्सिपल होते. त्यामुळे हेरॉल्डचे बरोबरच्या संबंधाने हेरॉल्ड व अन्नपूर्णा चे लग्न जमले.

१८५३ मध्ये जन्मलेला स्कॉटिश हेरॉल्ड १८५६ साली बडोद्यात आला. तो एका शिक्षणिकाराचा असिस्टंट होता व नंतर तो इंग्रजी आणि इतिहासचा प्रोफेसर झाला. १८९९ मध्ये हेरॉल्ड-अन्नपूर्णा इंग्लंडला गेले. अन्नपूर्णा मात्र ३३ व्या वर्षीच निधन पावली.

१९३० साली रविंद्रनाथ टागोर बडोद्यात आले. त्यांनी कीर्तीमंदिर लेक्चर सिरीज मध्ये व्याख्यान दिले. त्याचे १९३२ मध्ये मॅन ऑफ द आर्टिस्ट ह्या नावे पुस्तक बडोद्याच्या प्रेसमध्ये छापून प्रसिद्ध झाले.

रविंद्रनाथ टागोर यांनी त्यांच्या पहिल्या प्रेमाल नलिनी' नाव दिले होते व त्याच नावाने पुढील अनेक काव्यातून तसा उल्लेख करत असत.

महाराजा सयाजीराव यूनिवर्सिटी मध्ये आजही त्यांच्या नावाची टागोर चेयर अस्तित्वात आहे.

♦

## हिंदुस्थान दीपोत्सव २०२०
## (दिवाळी अंक)





हिंदुस्थान दीपोत्सव दिवाळी अंक २०२० साभार पोच. श्री.विनोद मराठे, अमरावती यांचेकडून प्राप्त.

**प्रबंध संपादक :** श्री.विलास मराठे
**अतिथी संपादक :** निशिगंधा वाड
**पाने :** २३४
**किंमत :** ८०.०० रुपये

## साभार पोच




मराठे उद्योग समूहाच्या तिसऱ्या पिढीतील श्री. यशवंत मराठे यांनी आपल्या समूहातील प्रिंटीग मशीन उत्पादन करणाऱ्या कंपनीपासून आपली कारकीर्द सुरू केली. मात्र ठरवून वयाच्या ५०व्या वर्षी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि स्वतःला समाज कार्याला वाहून घेतले. पालघर जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांवर पाण्याच्या समस्यांचे निराकरण करण्याचे कार्य त्यांनी स्थापन केलेली नीरजा ही स्वयंसेवी संस्था गेली १० वर्षे करीत आहे. सुमारे २ वर्षांपूर्वी त्यांनी सरमिसळ हे सदर लिहायला सुरुवात केली. आवडीच्या विविध विषयांवर आजवर लिहिलेल्या सुमारे १६० लेखांमुळे हे सदर Whats appच्या माध्यमातून खुपच लोकप्रिय झाले. नुकतेच त्यांनी आपले लेख २ संकेतस्थळांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले आहेत. त्यानंतर एक उद्योजक ते लेखक हा प्रवास छापील स्वरुपात आणावा असे वाटल्याने ग्रंथाली या संस्थेने त्यांच्या निवडक लेखांचे एक पुस्तक प्रसिद्ध केले ते म्हणजे 'छपाई ते लेखणी'. या कोरोना काळात असलेल्या निर्बंधांमुळे मराठे निवडक मंडळींच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा कालनिर्णयचे श्री. जयराज साळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच दि. १ डिसेंबर रोजी पार पडला. अर्थात ह्या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण फेसबुकच्या माध्यमातून करण्यात आले होते. त्यांचे हे पुस्तक लवकरच Online विक्रीसाठी उपलब्ध होईल. https://sarmisal.in/आणि https://historycafe.in/2020/11/18/surveyor-general / या दोन लिंकवर Click करूनही आपण त्यांचे लेख वाचू शकाल. श्री. यशवंत मराठे यांना एक यशस्वी Blogger म्हणून अधिकाधिक यश लाभो. त्यांच्या भावी वाटचालीस 'मराठे प्रतिष्ठानच्या'वतीने हार्दिक शुभेच्छा. ♦




## 'मराठे प्रतिष्ठान' आयोजित घरगुती श्रीगणेश उत्सव सजावट स्पर्धा २०२०चा निकाल

| प्रथम पारितोषिक | द्वितीय पारितोषिक | तृतीय पारितोषिक |
|---|---|---|
|  |  |  |
| **परीणिता प्रमोद मराठे** *पुणे, महाराष्ट्र* | **नुपूर प्रशांत मराठे** *अहमदाबाद, गुजरात* | **कार्तिक मराठे** *सिरसी, कर्नाटक* |

**विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**